दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com ▶ RNI No.MAHMAR/2019/79184

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ६४ वा ▶ सोमवार दि.८ जानेवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...

खास लोकांच्या आग्रहास्तव

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे

पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध

धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला

स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस

रात्री १०.३० वाजेला



संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896

द.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### बोगस डॉक्टर शिंदखेड्यात गुन्हा

**धुळे ।** शेवाडे (ता. शिंदखेडा) येथे चौकातील शॉपिंग कॉम्प्लेक्समधील बोगस डॉक्टरवर कारवाई झाली. सुहास अर्जुन वाघ असे त्याचे नाव आहे. तो वैद्यकीय व्यवसायाचा कोणताही परवाना नसताना तसेच मेडिकल परिषदेकडे कुठलीही नोंदणी न करता अनधिकृतपणे रुग्णांवर होमिओपॅथी, ॲलोपॅथिक प्रकारचे वैद्यकीय उपचार करीत रुग्णांच्या जिवाशी खेळ करून क्लिनिक चालवीत होता. त्याच्याविरोधात चिमठाणे आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अक्षयकुमार कैलास मराठे यांनी शिंदखेडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

### जाब विचारण्यावरून हॉटेलचालकास मारहाण

**धुळे ।** वडिलांनी शिवीगाळ का केली याचा जाब विचारल्याच्या कारणावरून बलजितसिंग गुरुदेवसिंग बंस (वय १९, रा. अरिहंतनगर, मोहाडी) या हॉटेलचालकास तिघींनी खांद्यावर व मनगटावर चाकूने वार केले. तसेच लाकडी दांडका व हाताबुक्क्यांनी मारहाण करीत जखमी केले. शिवीगाळ करून ठार करण्याची धमकी दिली. ४ जानेवारीला दुपारी एकच्या सुमारास हा प्रकार घडला. याबाबत हॉटेलचालकाच्या तक्रारीवरून मीना संजय पवार, स्नेहल संजय पवार व रमाबाई गावडे (सर्व रा. मोहाडी, धुळे) यांच्यावर गुन्हा दाखल झाला.

# मराठी नाट्य रसिक जिवंत आहेत तोपर्यंत मराठी नाटक संपणार नाही

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**पुणे । चंद्रशेखर पाटील**

### ७५ नाट्यगृह बांधण्याचा शासनाचा संकल्प : सुधीर मुनगंटीवार



महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव वाढविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. नाट्य क्षेत्रात अनुकूल बदल करण्यासाठी ७५ नाट्यगृह बांधण्याचा शासनाने संकल्प केला असून सांस्कृतिक कार्य विभागामार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांची ५२ नाट्यगृहांमध्ये आधुनिकता आणण्याचाही प्रयत्न आहे. असे त्यांनी सांगितले.



### ज्यांनी केवळ नाटकं केली, त्यांना लोक घरी बसवतात

आपल्याकडे तिसरी घंटा वाजली की नाटक सुरू होते. आमच्याकडे आचारसंहितेची तिसरी घंटा वाजली की आम्ही तयारीला लागतो. पण, चांगल्या तालमी केल्या की प्रेक्षकांचा आशीर्वाद मिळतो, तसा आम्हालाही मिळतो. ज्यांनी केवळ नाटकं केली, त्यांना लोक घरी बसवतात. २०१९ साली 'कट्यार पाठीत घुसली', हा प्रयोग झाला. मग २०२२ साली आम्ही प्रयोग केला, 'आता होती गेली कुठे?' त्यामुळे अशाप्रकारचे प्रयोग चालूच असतात, असंही फडणवीस म्हणाले.

चांगल्या तालमी केल्या तर प्रेक्षकांचा आशीर्वाद मिळतो तसा आम्हालाही मिळतो. ज्यांनी केवळ नाटकी केली त्यांना लोकं घरी बसवतात. महाहाराष्ट्राने बघितलं २०१९ साली प्रयोग झाला कट्यार पाठीत घुसली, काळजात नाही, पाठीत. आणि मग २०२२ मध्ये आम्हीही प्रयोग केला आता होती गेली कुठे? त्याच्यामुळे अशा प्रकारचे प्रयोग सुरूच असतात. असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता त्यांना लगावला. ते पिंपरी चिंचवड येथे आयोजित शंभराव्या अखिल भारतीय नाट्य संमेलनात बोलत होते.

नवीन नाट्यगृह असतील किंवा जे जुने नाट्यगृह आहेत ते दुरुस्त करण्याचं काम सुरू आहे. एक गोष्ट लक्षात घ्या की, मराठी रंगभूमी आणि मराठी रंगकर्मी यांनी यांनी या देशामध्ये रंगभूमी टिकवण्यासाठी सिंहाचा वाटा उचलला आहे. देशातील सर्वोत्तम रंगभूमी ही मराठी आहे. जर मग आम्ही सर्वोत्तम असू तर मग टिकवण्याची, जगविण्याची जबाबदारी ही आपलीच आहे. त्यामुळे नव्या मुल्यांरुप बदल करावे लागतात. परंतु हे करत असताना शाश्वत मुल्यं जपावी लागतात. मुखपट, बोलपट आले त्यानंतर टीव्ही आले तेव्हा लोक म्हणायची की नाटकं संपतील परंतु तसे झाले नाही. महाराष्ट्रातील मराठी नाट्य रसिक जीवंत आहे तोपर्यंत नाटक संपणार नाही. मराठी रंगकर्मींनी काय केलं तर त्यांनी समृद्ध रसिक तयार केली असेही प्रतिपादन देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले. मराठी नाटकं मुलांना, आताच्या पिढींना दाखवले पाहीजे असं अभिनेते प्रशांत दामले म्हणाले, परंतु मला असं सांगायचं की, जगभरात तुम्ही नाटकांची प्रयोग करत आहात तेव्हा महाराष्ट्रातील नाटक संपणारच नाही. चिंता करू नका, मराठी रसिक तुम्हाला मागे वळून पाहू देणार नाहीत. सोबतच वृद्ध कलावंतासाठी आराखडा तयार करा, त्यासाठी सर्व आर्थिक मदत राज्य सरकार करेल असेही आश्र्वासन फडणवीस यांनी दिले.

## मामा, दादा ही नाती घरीच ठेवा, व्यासपीठावर एकमेकांना मान द्या

### राज ठाकरेंच्या मराठी कलाकारांना कानपिचक्या

**पुणे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

१०० व्या अखिल भारतीय नाट्यसंमेलनात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची मुलाखत घेण्यात आली. यावेळी राज ठाकरे यांनी त्यांच्या नाटकाविषयीच्या प्रेमाबद्दल भाष्य केलं. नाटक पाहिलेला माणूस हा महाराष्ट्रात नाही असं होणारच नाही, असं राज ठाकरे यांनी म्हटलं. जसं आमच्या भाषणाला रिटेक नाही, तसं नाटकाला ही रिटेक नसतो. खरं तर हल्ली सकाळी सकाळी बातमी पाहिली की म्हणावं वाटतं की थोडं रिटेक घ्या, असं म्हणत राज ठाकरे यांनी खोचक टोला लगावला. या मुलाखतीदरम्यान राज ठाकरे यांनी मराठी कलाकरांचे कान टोचलेत. मराठी कलाकरांनी व्यासपीठावर,चारचौघात एकमेकांना मान द्यायलाच हवा असं राज ठाकरे यांनी म्हटलं.



पुण्यात १०० व्या अखिल भारतीय नाट्यसंमेलानाचे आयोजन करण्यात आले आहे. या नाट्यसंमेलानादरम्यान दीपक करंजीकर यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची मुलाखत घेतली. रजनीकांत आणि इलाहीराजा रात्री एकत्र बसून दारू बसत असतील, मात्र मंचावर आले की ते एकमेकांना सर म्हणून आदर देतात. मराठी कलावंतांनी याचं अनुकरण करायला हवं. मानसन्मान द्या. तुम्ही जर नाक्यावर उभं राहिला तर तुम्हाला कोणी पैसे देऊन पाहायला येणार नाही. आज अशोक सराफ हे चौकात उभे राहिल्याचे दिसले नाहीत, म्हणून मी पैसे मोजूनचं त्यांना पाहायला जाईन. आता इथं प्रशांत दामले अध्यक्ष आहेत. आता मी चार भिंतीत त्यांना काहीही म्हणेन, मात्र इथं मी त्यांना सर म्हणेन. आता अशोक सराफांना हे काय म्हणतात मामा, अरे तुझा काय सख्खा मामा आहे का? अरे सर म्हणा ना? आता शरद पवार इथं आले तर मी त्यांना वाकून नमस्कार करेन, कारण ते वरिष्ठ नेते आहेत. माझ्या भाषणात मी त्यांच्यावर बोलेन मात्र समोर आल्यावर त्यांचा त्यांना मानसन्मान देईनच. त्यामुळं मराठा कलावंतांनी ही गोष्ट पाळायला हवी, असं म्हणत राज ठाकरे यांनी मराठी कलावंतांचे कान टोचलेत.

## दहा लाखांचा मद्यसाठा जप्त; निजामपूर पोलिसांची कारवाई

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

निजामपूर (ता. साक्री) पोलिसांनी पाठलाग करून वाहनासह सुमारे दहा लाखांचा मद्यसाठा पकडला.

नंदुरबारकडून दहिवेलमार्गे पांढऱ्या रंगाच्या बोलेरोतून मद्याची वाहतूक केली जात असल्याची माहिती निजामपूर पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी हनुमंत गायकवाड यांना मिळाली. या महितीच्या



आधारे निजामपूर पोलिसांनी सापळा रचला. संशयित पांढऱ्या रंगाचे बोलेरो (एमपी ०९, बीसी ३१२५) वाहन छडवेल रस्त्याने जात असताना पोलिस पथकाने पाठलाग केला. पोलिस पाठलाग करीत असल्याचे पाहून बोलेरोचालकाने गाडी कच्च्या रस्त्याने पळविली. वाहनासह सुमारे दहा लाखांचा मद्यसाठा जप्त केला.

## जामचा मळा भागातून दुचाकी लांबविली

**धुळे ।** जामचा मळा भागातील एका मशिदीजवळ उसमान रमजान पिंजारी (वय ६२) यांच्या दाराजवळ लावलेली एमएच १८ एएफ ६७०४ क्रमांकाची १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने लंपास केली. ही घटना २६ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता घडली. सर्वत्र शोध घेण्यात आला. दुचाकी मिळून आल नाही.

## पवार अपघाताने सत्तेत, त्यांना आम्ही सरकार मानत नाही: मनोज जरांगे

**बीड । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे. मुंबईला येतांना जर कोणी कायदा हातात घेणार असेल तर, त्यांच्यावर कठोर कारवाई करणार असल्याचे म्हणणाऱ्या अजित पवारांच्या पोटातलं ओठांवर आले असल्याचे मनोज जरांगे म्हणाले आहेत. बीडच्या दौऱ्यावर असतांना पत्रकारांशी बोलतांना जरांगे यांनी हे वक्तव्य केले आहे.

मराठा आरक्षणाच्या आंदोलनाची लढाई आता अंतिम टप्प्यात आली असून, मुंबईमध्ये मनोज जरांगे पाटील हे उपोषण करणार आहेत. यावरच कल्याणमध्ये कार्यकर्ता मेळाव्यामध्ये अजित पवार बोलताना असं म्हणाले की, मुंबईला येताना जर कोणी कायदा हातात घेतला तर त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. यावर मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तुम्ही पहिल्यापासून हेच केलं. तुम्ही पहिल्यापासून मराठ्यांच्याच मुळावर उठले. तुम्ही मौन धरलं होतं, त्यामुळे तुम्ही मराठा समाजाच्या पाठीशी असल्याचं आम्हाला वाटले होते. शेवटी अजित पवार यांनी पोटातलं ओठावर आणलंच. आम्ही मुंबईला जाण्यावर ठाम असून, जर कारवाई केली तर मराठा समाज शांततेत अजित पवारांना उत्तर देईल. अजित पवार हे अपघाताने सरकारमध्ये आलेले आहेत. त्यामुळे आम्ही त्यांना सरकार मानत नाहीत असेही म्हणाले आहेत. सरसकट आरक्षण घेतल्याशिवाय आपली आता माघार नाहीच, असेही जरांगे म्हणाले आहेत.

## कुसुंबा ते दोंडाईचा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचं खा.डॉ. सुभाष भामरे यांच्या हस्ते भूमिपूजन

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे मालेगाव ते दोंडाईचा या राष्ट्रीय महामार्ग १६० एच अंतर्गत कुसुंबा ते दोंडाईचा या महामार्गाच्या दुसर्या टप्प्यातील कामाचे भूमिपूजन लामकानी येथे संपन्न झाले.

खासदार डॉ. भामरे यांच्या सततच्या पाठपुराव्याने व केंद्रीय



भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या सहकार्याने धुळे जिल्ह्यात नवीन चार महामार्ग राष्ट्रीय महामार्ग जाहीर झाले होते. यात दोंडाईचा ते मालेगाव या एकूण ९६ किलोमीटर १६० एच राष्ट्रीय महामार्गाचा समावेश होता. या महामार्गांतर्गत पहिल्या टप्प्यात १६५ कोटी ५० लाखांच्या निधीतून कुसुंबा ते मालेगाव या ४१.७५ किलोमीटरच्या काँक्रिटीकरणाचे काम पूर्णत्वास आले असून, या महामार्गावरून आता वाहतूकही सुरू झाली आहे. महामार्गाच्या कामाचे खा. डॉ. सुभाष भामरे यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. यावेळी जि.प.चे माजी अध्यक्ष तथा भाजपचे ज्येष्ठ नेते सुभाष देवरे, जि.प. अध्यक्षा धरती देवरे, माजी अध्यक्षा अश्विनी देवरे, माजी अध्यक्ष मनोहर भदाणे, माजी अध्यक्ष सुधीर जाधव, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी सभापती प्रा. अरविंद जाधव, उद्योग आघाडीचे प्रदेश सहसंयोजक उत्कर्ष पाटील, किसान आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष बापू खलाणे, जि.प. सदस्य राम भदाणे, संग्राम पाटील, आशुतोष पाटील, ज्ञानेश्वर चौधरी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या ४२ जणांवर कारवाईचा बडगा

### पोलीस ॲक्शन मोडमध्ये

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

सर्वत्र मकर संक्रांत सणानिमित्ताने पंतग उडविण्यासाठी नागरिकांमध्ये उत्साह दिसून येत आहे. परंतु, पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पारंपारिक मांजाऐवजी नायलॉन तसेच काचेचा वापर करून तयार करण्यात आलेल्या प्रतिबंधित मांजाची विक्री काही जणांकडून केली जात असल्याचे आढळून आले आहे. अशांवर नाशिक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून शहरात अवैध नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या ४२ जणांविरोधात हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

पतंगाच्या मांजामुळे पक्षी, प्राणी व मानवी जिवीतास धोका निर्माण होतो. पक्षी, प्राणी, नागरीक, बालके, वयोवृद्ध, वाहनस्वार जखमी होण्याचे अथवा प्राण गमाविण्याच्या घटना याआधी घडल्या आहेत. तुटलेला मांजा विजेच्या तारामध्ये अडकून काही ठिकाणी आगी देखील लागण्याच्या घटना घडलेल्या आहेत. या पार्श्र्वभूमीवर नाशिक पोलिसांकडून दि. २३ जानेवारीपर्यंत नायलॉन मांजा विक्री व वापरावर मनाई आदेश जारी करण्यात आला आहे.

## खोक्यात बंद झालेल्यांना परत घरात घेणार नाही

### ठाकरे यांचा शिंदे गटावर हल्लाबोल

**मुबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

बाहेर भटकंतीला गेलेल्या, खोक्यात बंद झालेल्यांना पुन्हा घरात घेणार नाही, असा आसूड माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटावर ओढला आहे. उल्हासनगर येथील राजेश वानखेडे यांनी आज शेकडो सहकाऱ्यांसह ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत 'मातोश्री' निवासस्थानी शिवबंधन बांधून पक्षात प्रवेश केला. यावेळी शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना उद्धव ठाकरे यांनी शिंदेंचा समाचार घेतला. दरम्यान राजेश वानखेडे यांनी शिवसेनेत प्रवेश करताच आज आपल्या घरात आल्यासारखेवाटतं अशा शब्दात भावाना व्यक्त केल्या.

## वीज कनेक्शन तोडल्याने रागातून अभियंता आणि कर्मचाऱ्यास मारहाण, गुन्हा दाखल

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

वीज कनेक्शन तोडल्याच्या रागातून वीज कंपनीच्या शिरुड शाखेच्या सहायक अभियंत्यासह कर्मचाऱ्याला शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली होती. शासकीय कामात अडथळा आणण्यात आला होता.

या प्रकरणी धुळे तालुका पोलिस ठाण्यात सायंकाळी ५ वाजता गुन्हा दाखल होताच वसंत जगन्नाथ चौधरी (याला अटक करण्यात आली. वीज वितरण कंपनीचे शिरुड कक्षाचे सहायक अभियंता तुषार प्रकाश महाजन (वय ४२, रा. गोपाळनगर, धुळे) यांनी फिर्याद दाखल केली. त्यानुसार धुळे तालुक्यातील



रतनपुरा गावात वीज कंपनीचे पथक थकबाकीदारांकडे जाऊन बिल भरण्याबाबत आवाहन करत होते.

ज्यांच्याकडे वारंवार चकरा मारूनसुद्धा वीजबिल भरण्यास टाळाटाळ करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांचे वीज कनेक्शन तोडण्याचे काम सुरू होते. गावातीलच वसंत जगन्नाथ चौधरी यांच्याकडे वीज कंपनीची थकबाकी असल्याने पथकाने त्यांच्या घराचे कनेक्शन तोडले आणि तातडीने बिल भरण्याची सूचना केली. बिल भरल्यानंतर कनेक्शन पुन्हा जोडले जाईल, असेही सांगण्यात आले. परंतु, कनेक्शन का तोडले? असा जाब विचारत वसंत चौधरी याने पथकाला धारेवर धरण्याचा प्रयत्न केला. शिवीगाळ करत वाद घातला. शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

## मनोरंजनक्षेत्र देखील चित्रपटांद्वारे राष्ट्रसेवेत योगदान देते

### दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांचे प्रतिपादन

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

आपल्या पुढच्या पिढ्यांचा आवाज बुलंद व्हायला हवा असेल तर सगळ्यांनी मिळून परिवर्तन घडवायला हवे. स्वातंत्र्याने सर्वांना आत्मसन्मानाने जगण्याचा अधिकार दिला. आता सर्व स्तरावर समानता हवी आहे. पण ती मतांच्या फायद्यासाठी नव्हे तर मानवतेच्या पायावर व्हावी. व्होट बँक राजकारणामुळे इतिहास सोयीस्करपणे बदलला जातो. सत्य दडपले जाते. ते समोर आणण्याचे काम करतोय असे सांगून मनोरंजन क्षेत्र देखील राष्ट्रसेवेत



योगदान देते असे प्रतिपादन सुप्रसिद्ध दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांनी केले.

रोटरी क्लब या आंतरराष्ट्रीय सेवाभावी संस्थेचा भव्य मेळाव्याच्या दुसऱ्या दिवशी काल ( दि.७) ते बोलत होते. दोन दिवसीय परिषद व मेळावा शनिवार दि.६ व रविवार दि.७ जानेवारी रोजी ग्रेप काउंटी येथे आयोजित करण्यात आला होता. विवेक अग्निहोत्री यांनी कश्मीर फाईल्स चित्रपट, बुद्धा इन ए ट्राफिक जाम, त्यावर आधारित अर्बन नॅक्सल्स हे पुस्तक, वैक्सीन वॉर, ताश्कंद फाईल्स या आपल्या चित्रपटांचे संदर्भ देऊन त्यांनी उपस्थित रोटेरियन्सना स्वतःला योग्यवेळी ओळखून समाजिक परिवर्तन घडविण्यास सज्ज व्हावे. असे आवाहन केले.

'आशाए... ए कार्निवल ऑफ होप' या परिषद, मेळाव्याचे यशस्वी आयोजन रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० च्या गव्हर्नर आशा वेणूगोपाल व पदाधिकाऱ्यांनी शानदार आयोजन केले. १० वर्षांनंतर नाशिकमध्ये झालेल्या या भव्य मेळाव्यात १८०० पेक्षा जास्त रोटरी प्रतिनिधी सहभागी झाले होते. यावेळी झालेली परिषद सर्व रोटरी क्लबकरिता तसेच समाजासाठी व विविध प्रकल्प, उपक्रमांसाठी महत्वाचे व्यासपीठ ठरली. दोन दिवसात मान्यवर वक्त्यांनी त्यांचे समृद्ध अनुभव सांगून समाजोपयोगी अभिनव कल्पना मांडल्या. पहिल्या दिवशी शनिवारी इस्कॉनचे मार्गदर्शक गौरांग दास प्रभुजी, मध्यप्रदेशातील सरपंच भक्ती शर्मा, मेजर जनरल संजयकुमार विद्यार्थी, निवृत्त आयपीएस अधिकारी कृष्ण प्रकाश, भारती ठाकूर यांनी प्रेरक विचार व्यक्त करून सर्वांना सेवेचा मंत्र सांगितला.

मेळावा व परिषदेच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष जयंत खैरनार, राजीव शर्मा, डॉ. के.एस.राजन, किशोर केडिया, शब्बीर शाकीर, महेश मोकळकर, ॲड. शिशिर हिरे, ममता जायस्वाल, संजय अरोरा, आनंद झुनझुनवाला, आगामी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर ज्ञानेश्वर शेवाळे, जयेश संघवी व सर्व रोटरी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.



## नोटीस टाळून ईडीची पिडा कशी टाळणार?

कायद्यासमोर सर्व समान असतात. आम्हीही कायद्याचा आदर करतो. केंद्रातील भाजपाचे सरकार हे संविधानविरोधी आहे, असा प्रचार विरोधी पक्षांकडून भाजपाला बदनाम करण्यासाठी नेहमीच केला जातो; परंतु 'करनी आणि कथनी'मध्ये फरक असतो तो इंडिया आघाडीत सहभागी झालेल्या पक्षांच्या काही नेत्यांकडे पाहिल्यानंतर लक्षात येते. ईडी ही देशात तपास करणारी एक स्वतंत्र यंत्रणा आहे; परंतु आपले काळे कारमाने लपविण्यासाठी ईडीला आरोपांच्या पिजऱ्यात उभे करण्याचे काम गेले काही दिवस हेतुपुरस्कर केले जात आहे. समन्स आल्यानंतर चौकशीला जाऊन आपली बाजू मांडणे हा साधा सरळ अर्थ आहे; परंतु चौकशीला गेले तर आपल्याला अटक होईल ही भीती मनात असल्याने, सध्या देशातील दोन मुख्यमंत्री ईडीच्या समन्सला धाब्यावर बसविण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यातील एक म्हणजे दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल. ईडीकडून तीन समन्स पाठवून सुद्धा ते अद्याप हजर झाले नाहीत. याउलट केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाने ईडीचे समन्स बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. पहिले समन्स पाठविण्यात आले, त्यावेळी प्रत्यक्ष हजर न राहता एका पत्रातून उत्तर देण्याचा प्रयत्न केजरीवाल यांनी केला. मध्य प्रदेश, राजस्थान विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराला जात असल्याने आपल्याकडे वेळ नाही, अशी सबब सुरुवातीला सांगण्यात आली. दुसऱ्या समन्सच्या वेळी, मी विपश्यना ध्यान करण्यासाठी पंजाबला जात आहे, असे कारण दिले. तिसऱ्या समन्स पाठविल्यानंतर केजरीवाल यांनी ईडी समोर हजर न राहण्याचा निर्णय घेतला. राजकीय हेतूने प्रेरित हे समन्स आहे. हे समन्स मागे घ्यावे अशी उलट विनंती केजरीवाल यांनी केली. ज्या केजरीवाल यांनी अण्णा आंदोलनाच्या माध्यमातून देशातील भ्रष्टाचार दूर व्हावा यासाठी चळवळ उभी केली. नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप असतील तर त्यांनी त्या पदापासून दूर व्हावे अशी मागणी करत तत्कालीन केंद्रातील काँग्रेस सरकारच्या मंत्र्यांवर आरोप केले होते; परंतु तीच आरोपाची वेळ स्वत:वर येते तेव्हा मात्र केजरीवाल यांना आपण फक्त धुतल्या तांदळासारखे आहोत असे वाटते का? ज्या आम आदमी पार्टीचे दोन मंत्री आणि एक खासदार दारू घोटाळ्याप्रकरणी अटकेत आहेत. त्याच प्रकरणात ईडीला केजरीवाल यांची चौकशी करायची आहे; परंतु ते चौकशी टाळत आहेत. आपला त्यात सहभाग निष्पन्न होईल आणि कधीही अटक होईल अशी भीती केजरीवाल यांना वाटत तर नसावी ना? दुसरे मुख्यमंत्री आहेत झारखंडचे हेमंत सोरेन. सोरेन यांना ईडीने सात वेळा समन्स पाठविले आहे; परंतु कोणतेही कारण पुढे करत ते सुद्धा ईडीसमोर चौकशीला जायला तयार नाहीत. एका जमीन व्यवहारप्रकरणी त्याची बाजू ईडीला समजावून घ्यायची आहे, यासाठी ईडीकडून त्यांना वारंवार समन्स पाठविण्यात आले. ईडीला दाद देत नसल्याने आज बुधवारी ईडीने सोरेन यांच्या जवळच्या व्यक्तींच्या कार्यालयावर छापे टाकले आहेत. झारखंडमधील बेकायदेशीर खाणकामांशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) रांची आणि राजस्थानमधील १० ठिकाणी छापे मारले आहेत. यामध्ये झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे प्रेस सल्लागार अभिषेक प्रसाद यांचा समावेश आहे. कथित जमीन घोटाळ्याशी संबंधित आणखी एका प्रकरणात, ईडीने शनिवारी सोरेन यांना सातव्यांदा समन्स बजावले होते. या समन्सनुसार सोरेन यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली होती. आम्ही तुम्हाला मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायदा, २००२ च्या कलम ५० अंतर्गत तुमचे म्हणणे नोंदवण्याची ही शेवटची संधी देत आहोत. ही नोटीस/समन्स मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत उत्तर देणे आवश्यक आहे, असे ईडीने नोटिशीत म्हटले आहे. याचा अर्थ तपास यंत्रणा म्हणून संबंधित व्यक्तीला शेवटपर्यंत संधी देण्याचे काम ईडीकडून करण्यात आल्याचे दिसून येते. बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांच्यावरही कारवाईची टांगती तलवार आहे. तेजस्वी यादव यांनी ५ जानेवारी रोजी हजर राहावे असे समन्स ईडीकडून प्राप्त झाले आहेत. नोकरीच्या बदल्यात तरुणांकडून जमीन खरेदी केल्याचा आरोप तेजस्वी यादव यांच्यावर आहे.

## शिक्षणमंत्र्यांसमोर शाळा बंद पडू न देण्याचे आव्हान !

राज्य सरकार शाळा बंद करणार आणि बार्सना परवानगी देणार या आशयाच्या बातम्या मध्यंतरी प्रसिद्ध झाल्या होत्या त्यावर शिक्षणमंत्री दीपक केसरकर कडाडले होते. या सर्व अफवा असून राज्यातील एकही शाळा बंद पडू देणार अशी घोषणा त्यांनी त्यावेळी केली. याच घोषणेचा उच्चार मागील काही महिन्यांपासून ते जिथे जात आहेत तिथे करत आहेत. गेल्या महिन्यात पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनातही त्यांनी याचा पुनरुच्चार केला. राज्यातील मुला -मुलींनी शिक्षणापासून वंचित राहता काम नये यासाठी शिक्षणमंत्र्यांना असलेली तळमळ कौतुकास्पद आहे.

आजमितीला महापालिका शाळांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिदिन पोषण आहारासह शिक्षणासाठी लागणारे सर्व साहित्य शासनाच्या वतीने मोफत देण्यात येते. शाळेच्या दफ्तरापासून गणवेश, वह्या, पुस्तके, कंपासपेटी, पेन्सिल, खोडरबर, रेनकोट, सँडल, मोजे, रुमाल सर्व काही विनामूल्य मिळते त्यामुळे पालकांना कोणतीही वस्तू पदरचे पैसे खर्च करून विकत आणावी लागत नाही. शाळांमध्ये पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह, खेळाचे मैदान यांचीही सोय बऱ्यापैकी असते. बदलत्या काळानुसार मुलांना संगणक प्रशिक्षण देण्यासाठी प्रत्येक शाळांत संगणकांचीही व्यवस्था करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची पुरेपूर काळजी सरकारने घेतली आहे. आमच्या काळात महानगरपालिका शाळेत केवळ सातवीपर्यंत शिक्षण दिले जात होते; मात्र एकेका इयत्तेचे चार चार वर्ग भरत असत. मागील काही वर्षांत शिक्षण क्षेत्रात खासगी शाळांचे वर्चस्व प्रस्थापित झाल्यामुळे महापालिका शाळांचा पट कमालीचा घसरू लागला, त्यामुळे महापालिकेने शाळांतून इयत्ता दहावीपर्यंत मोफत शिक्षण देण्यास सुरुवात केली. मुलांना इंग्रजी माध्यमांत शिक्षण देण्याकडे पालकांचा वाढता कल लक्षात घेऊन महापालिकेने इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणेही सुरु केले. आजमितीला मराठी शाळांच्या तुलनेत इंग्रजी माध्यमांच्या शाळांना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. एव्हढ्या सर्व सुविधा देऊनही मराठी माध्यमातील विद्यार्थी पट वाढवण्यास महापालिकेला सातत्याने अपयशच येत आहे. यामागे पालिकेची धोरणेही कुठेतरी आड येत असल्याचे लक्षात येते.

ज्या शाळांचा विद्यार्थी पट कमी आहे, अशा शाळांमध्ये दोन इयत्तांची मुले एकत्र बसवली जातात. त्यामुळे शिक्षक शिकवत असलेला भाग ग्रहण करताना दोन्ही इयत्तांच्या मुलांचा गोंधळ होतो. ही कसरत अंगवळणी पडण्यामध्ये शैक्षणिक वर्षाचा काही काळ निघून जातो. शाळांना पुरवण्यात येणारे शिक्षक हे इयत्तांच्या संख्येनुसार न देता शाळेतील पट संख्येच्या अनुसार दिले जातात. त्यामुळे काही इयत्तांना शिक्षकच मिळत नाहीत. एखादे शिक्षक दीर्घकालीन सुट्टीसाठी जातात तेव्हाही त्या इयत्तेला शिक्षक नसतात. याशिवाय कोणत्या ना कोणत्या ट्रेनिंगच्या नावाखाली आठवडा-आठवडाभर शिक्षक शाळांत अनुपस्थित असतात अन्य शिक्षकांकडे आधीच दोन दोन इयत्ता असल्याने ते तरी अनुपस्थित शिक्षकांचा वर्ग कसा सांभाळणार ? शिक्षक नसलेल्या इयत्ताना शिक्षक मिळवून देण्यासाठी पालकांनाच महापालिका कार्यालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात. काही शिक्षक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान नको म्हणून सुट्टीवर जाण्याआधी समाजातील खासगी शिक्षकाला पदरचे पैसे देऊन वर्ग घेण्यासाठी तात्पुरती सोय करतात, तर बरेच शिक्षक तेव्हढीही तसदी घेत नाहीत. महापालिका मर्यादेपेक्षा अधिक शिक्षक नेमू शकत नसल्याने महापालिकेचे शैक्षणिक अधिकारीच पालकांना खासगी शिक्षकाची व्यवस्था करण्यास सांगतात. या शिक्षकांचे मासिक वेतन शाळेतील महापालिकेच्या पे रोलवर असणाऱ्या शिक्षकांना दर महिन्याला आपल्या खिशातून भरावे लागते. पालिका अधिकाऱ्यांनी तात्पुरत्या स्वरूपात खासगी शिक्षक उपलब्ध करून दिले, तरी त्यांची बदली केव्हा होईल हे सांगता येत नाही. शिवाय या तात्पुरत्या शिक्षकांना ३-३ महिने वेतन मिळत नसल्याने आणि ते मिळवण्यासाठी यांना महापालिका कार्यालयात अनेक खेपा माराव्या लागत असल्याने हे तात्पुरते शिक्षकही पालिकेच्या व्यवस्थेवर नाराज असतात. शिक्षक नसलेल्या वर्गावर दुसरे शिक्षक उपलब्ध करून मिळेपर्यंत विद्यार्थ्यांच्या पालकांना भरपूर संघर्ष करावा लागतो. ज्यामध्ये बराच कालावधी निघून जातो. या काळात विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी शिक्षकच नसल्याने मुले मस्ती करण्यात दिवस घालवतात. जे शिक्षक महापालिकेने शाळांना दिले आहेत त्यांना शाळांच्या वेळेत इतरही प्रासंगिक कामे दिली जात असल्याने शिक्षक मुलांना शिकवणे सोडून ही कामे करत बसतात त्यामुळे पुन्हा विद्यार्थ्यांचे नुकसानच होते. गेल्या मासात आतापर्यंत शाळेत शिकून गेलेल्या मुलांच्या जातीच्या नोंदी महापालिकेकडून मागवण्यात आल्याने काही शिक्षक आठवड्याहून अधिक दिवस या नोंदी शोधायचे काम करत होते. खेळून कंटाळा आल्याने आणि अनेक दिवस शाळेत जाऊन शिक्षणच न मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या मनातही नकारात्मक विचार येऊन मुले शाळेत जाण्यास अनिच्छा दाखवू लागतात. त्यामुळे पालकांना त्याचा ताण येतो. शहरातील बहुतांश सरकारी शाळांची स्थिती थोड्याफार प्रमाणात अशीच आहे. सरकार मुलांना सर्व प्रकारच्या सुविधा तर देत आहे; मात्र ज्यासाठी विद्यार्थी शाळेत येतात ते शिक्षणच व्यवस्थित न मिळाल्याने विद्यार्थीही शाळा बदलण्यासाठी पालकांकडे हट्ट करू लागतात. आपल्या पाल्याचे शैक्षणिक नुकसान नको म्हणून पालकही सरकारी शाळेतून पाल्यांचे नाव काढून आर्थिक परिस्थिती नसताना त्यांना खासगी शाळेत भरती करतात. दरवर्षी असे अनेक विद्यार्थी महापालिका शाळांतून नाव कमी करून खासगी शाळांत जाऊ लागले आहेत. शालेय विद्यार्थ्यांना सुखसुविधा मिळण्यासाठी शासन ज्या प्रमाणात निधी खर्च करत आहे त्यातील काही निधी शाळांना दर्जेदार आणि पुरेसे शिक्षक देण्यासाठी खर्च केला, तर मुलांमध्येही शिक्षणाची आणि शाळेची आवड निर्माण होईल. ज्यामुळे विद्यार्थ्यांचे पालक समाधानी होऊन तेच शाळेतील विद्यार्थी पट वाढवण्यास स्वतःहून पुढाकार घेतील आणि महापालिका शाळांना लागलेली घरघर थांबण्यास मदत होईल. नवीन वर्षात शाळा बंद पडू द्यायच्या नसतील, तर सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अन्य सुविधांसोबत शाळेतील शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे मोठे आव्हान शिक्षणमंत्र्यांसमोर असेल आणि त्यासाठी शाळांना पुरेसे शिक्षक पुरवणे क्रमप्राप्त आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.९६६४५५९७८०

(माझा मुलगा मुंबईतील महापालिका शाळेत शिक्षण घेत असून वरील लेख स्वानुभवातून लिहिला आहे.)

## उद्घाटनाच्या लगबगीत अयोध्यानगरी


प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर उभे राहताना बघणे ही डोळ्यांचे पारणे फेडणारी घटना आहे. एखाद्याच्या जगण्यात 'राम' असणे परिपूर्णतेचे सूचक असते, तर 'राम' नसणे अर्थहिन जगणे सूचित करून जाते. सध्या अयोध्या राम मंदिरात साजऱ्या होणाऱ्या भव्यदिव्य कार्यक्रमाच्या पूर्वतयारीत गढून गेली आहे. रस्ते, गल्लीबोळापासून हमरस्त्यापर्यंतचा परिसर नव्या नवलाईने झळाळून निघतो आहे. अयोध्येतील वास्तव्यात दिसणारे हे लोभस चित्र. समस्त हिंदूंचे श्रद्धास्थान असणाऱ्या प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर उभे राहताना बघणे ही डोळ्यांचे पारणे फेडणारी घटना आहे. आजही भारतीय मनावर राम अधिराज्य करतो. माता-पित्यांप्रती श्रद्धा-प्रेम, बंधुभाव, मैत्र, पत्नीप्रेम, कुटुंबवत्सलता, प्रजारक्षण, पीडित-शोषितांचा उद्धार, उत्तम संघटन, अभेद्य योद्धा, शिष्यशिरोमणी अशा एक ना अनेक विशेषणांनिशी उल्लेखली जाणारी ही देवता पुराणकाळातील असली तरी वर्तमानातही वेगवेगळ्या संदर्भात तिचा सर्रास उल्लेख होतो. सध्या राम मंदिरात साजऱ्या होणाऱ्या भव्यदिव्य कार्यक्रमाच्या पूर्वतयारीत अयोध्या गढून गेली आहे.

रस्ते, गल्लीबोळापासून हमरस्त्यापर्यंतचा परिसर नव्या नवलाईने झळाळून निघतो आहे. रामाच्या काळात होते तसे लोभस रूप या नगरीला पुन्हा प्राप्त व्हावे आणि वातावरणात तितकेच मांगल्य असावे, यासाठी प्रत्येक यंत्रणा जीवाचे रान करताना दिसत आहे. अयोध्येतील वास्तव्यात हे लोभस चित्र पाहायला मिळत आहे. एखाद्याच्या जगण्यात 'राम' असणे परिपूर्णतेचे सूचक असते, तर 'राम' नसणे अर्थहिन जगणे सूचित करून जाते. म्हणूनच हा भारतीयांच्या श्वासात सामावलेला देव आहे, असेही आपण म्हणू शकतो. अशी श्रद्धा आणि अलोट प्रेम असल्यामुळेच आजही रामनवमीच्या दिवशी रामाच्या देवळात पाळणा सजतो. शृंगारलेल्या पाळण्यातील लहानग्या रामलल्लाला प्रेमाने जोजवले जाते. श्रद्धापूर्वक पाळणा गायला जातो. सुंठवडा वाटून त्याच्या जन्माचा उत्सव साजरा केला जातो. घरोघरी रामाचे नवरात्र बसते. सांज-सकाळी पूजा-अर्चना होऊन रामचरित्रातील सूरस कथांचे श्रवण, वाचन केले जाते. अशा या रामाने आपल्या आयुष्यात वनवास भोगला. न केलेल्या चुकीची शिक्षा घेतली. मात्र कलियुगातही त्याचा वनवास काही कमी कष्टाचा नव्हता. आपल्या हक्काच्या स्थानी येण्यासाठी आताही त्याला अनेक वर्षे वाट पाहावी लागली. मात्र राम मंदिराच्या उभारणीमुळे आता हा वनवास संपला आहे, असेच म्हणावे लागेल.

हा एक-दोन नव्हे तर तब्बल ४९२ वर्षांचा अखंड संघर्ष होता. त्यानंतर ३७ वर्षांची अखंड जनजागृती होती. मागे वळून बघायचे तर ९ नोव्हेंबर १९८९ रोजी बिहारच्या कामेश्वर चौपाल यांनी ऐतिहासिक पायाभरणी समारंभात उद्घाटनाचा दगड ठेवून राम मंदिराच्या उभारणीत मोलाची भूमिका बजावली. २००३ मध्ये, १५२८ पूर्वी वादग्रस्त जागेवर हिंदू संरचनेच्या अस्तित्वाची पुष्टी करण्यासाठी अलाहाबाद उच्च न्यायालयाने फोटोग्राफीसाठी रडार लहरींचा वापर करून ग्राऊंड पेनिट्रेटिंग रडार सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले. या पाहणीत जमिनीच्या अगदी खाली पसरलेल्या संरचनेचे अवशेष उघड झाले. सर्वेक्षणाच्या निष्कर्षांची सत्यता तपासण्यासाठी उच्च न्यायालयाने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाद्वारे उत्खनन सुरू केले. त्यातून समोर आलेल्या माहितीवरील अहवालानुसार जमिनीच्या खाली उत्तर भारतीय शैलीतील मंदिर अस्तित्वात असल्याची पुष्टी केली आहे. पुढे सप्टेंबर २०१० मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठाने सर्व दिवाणी खटले एकत्रितपणे सोडवताना मंदिर पाडण्याचा निर्णय कायम ठेवला. तथापि, लढलेल्या क्षेत्राचे तीन स्वतंत्र विभागात विभाजन करण्याचा ठराव झाला. सहभागी पक्षांपैकी कोणत्याही पक्षाने हा निर्णय स्वीकारला नाही. परिणामी, सर्व पक्षांनी सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. मार्च २०१९ मध्ये तीन सदस्यांसह मध्यस्थी समिती स्थापन करून निराकरण करण्याचा प्रस्ताव सर्वोच्च न्यायालयात ठेवण्यात आला होता. न्यायमूर्ती कलीफुल्ला, चेन्नई (सर्वोच्च न्यायालयातून निवृत्त), बी. श्रीराम पांचू, चेन्नई (मद्रास उच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील) आणि श्री श्री रविशंकर यांच्यामार्फत मार्चमध्ये मध्यस्ती प्रक्रिया सुरू झाली आणि जुलैच्या अखेरीस मध्यस्ती शक्य नसल्याचे मान्य करण्यात आले. नंतर सर्वोच्च न्यायालयाने ६ ऑगस्टपासून सर्व अपिलांची नियमित सुनावणी करण्याचे आदेश दिले. सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली पाच न्यायाधीशांचे पूर्ण खंडपीठ स्थापन करण्यात आले. त्या अंतर्गत ४० दिवस आणि १७० तास नियमितपणे सर्व पक्षांची मते ऐकण्यात आली. १६ ऑक्टोबर २०१९ रोजी सुनावणी पूर्ण झाली. ९ नोव्हेंबर, २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने एकमताने निर्णय दिला की भारत सरकारने १९९३ मध्ये विवादित चौदा हजार एकर जमीन आणि त्याच्या सभोवतालचे संपादन हे प्रभू रामाची हक्काची मालमत्ता असल्याचे निश्चित केले होते. या व्यतिरिक्त, संपूर्ण ७० एकर जागेवर मंदिराच्या बांधकामावर देखरेख करणारा वेगळा ट्रस्ट तयार करण्याचे सरकारला निर्देश देण्यात आले. त्यानुसार ५ फेब्रुवारी २०२० रोजी 'श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र' या नावाने ट्रस्टची स्थापना करण्यात आली. ५ ऑगस्ट २०२० रोजी सरसंघचालक डॉ. मोहन भागवत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूमिपूजन करून मंदिराच्या बांधकामाचे उद्घाटन केले. देशाच्या पवित्र नद्या आणि तीर्थक्षेत्रातील पवित्र पाणी तसेच माती भूमिपूजन समारंभासाठी समर्पित करण्यात आली. आता हाती घेतलेल्या या कार्याची उत्तम परिणिती दृष्टिक्षेपात आहे. अयोध्येत उभे राहत असणारे राम मंदिर समाजातील सर्व वर्गाला सुखावणारे आहे. अयोध्येतील सध्याचे वातावरण पाहता या मंदिर निर्माणाचा आनंद प्रत्येकावर सकारात्मक परिणाम करत असल्याचे स्पष्ट जाणवत आहे. इथे सर्व जातीधर्माचे, पंथाचे लोक आपापल्या परीने खारीचा वाटा उचलण्यात गर्क आहेत. म्हणूनच हे सर्वांचे मंदिर असल्याची भावना प्रत्येकाच्या मनात आहे. या भव्य मंदिरासाठी लागलेला निधी अफाट आहे, पण तो कोणा मोजक्या धनदांडग्यांकडून घेतलेला नाही तर दोन वर्षांपूर्वी सर्वसामान्यांकडून निधी गोळा करण्याचे अभियान राबवून मंदिरासाठी लागणारा पैसा उभा करण्यात आला आहे. त्यामुळेच या मंदिर निर्माणाशी समाजातील सर्व जनांची नाळ जोडली गेली आहे. मंदिरात रामलल्ला विराजमान होताना, विधिवत पूजा संपन्न होताना यातील सर्वांना उपस्थित राहणे शक्य नसले तरी आपापल्या ठिकाणी देवतेची पूजा करून आणि मुहूर्तावर रामलल्लाचा अभिषेक संपन्न होऊन प्रतिष्ठापना झाल्यानंतर आरती करून लोक आहेत त्या जागेवरून या समारंभाचा भाग बनू शकतात. या समयी यथाशक्ती नैवेद्य वाटप करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. ही कृतीदेखील समाजातील बंधुत्व वाढवण्याचे काम करेल. वनवास संपवून राम, सीता आणि लक्ष्मण नगरीत परतले तेव्हा लोकांनी गुढ्या उभारून आणि दारी दिवे लावून त्यांचे स्वागत केले होते, असे म्हणतात. हाच संदर्भ ध्यानी धरत मंदिरात रामलल्ला विराजमान होतील, त्या दिवशी सायंकाळी लोकांनी आपल्या दारासमोर पाच दिवे लावावेत आणि आनंद व्यक्त करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. दारासमोर उजळणारा हा प्रकाश आपली अस्मिता जागवणारा असेल. गेली कित्येक वर्षे आपण न्याय्य हक्कासाठी तीव्र लढा दिला आहे. यासाठी अनेकांनी अपार कष्ट भोगले आहेत. काहींनी त्यात आपले प्राण गमावले आहेत. त्यामुळेच दिव्याची ही रोषणाई त्यांच्या स्मृतींना अभिवादनही असू शकते. सध्या अयोध्या या भव्य-दिव्य कार्यक्रमाच्या पूर्वतयारीत गढून गेली आहे. रस्ते, गल्लीबोळापासून हमरस्त्यापर्यंतचा परिसर नव्या नवलाईने झळाळून निघतो आहे. रामाच्या काळात या नगरीचे होते तसे लोभस रूप पुन्हा प्राप्त व्हावे आणि वातावरणात तितकेच मांगल्य असावे, यासाठी प्रत्येक यंत्रणा जीवाचे रान करताना दिसत आहे. मुख्य म्हणजे मंदिर बांधताना पर्यावरणरक्षणाचा बारकाईने विचार केला गेल्यामुळे इथल्या जैवविविधतेला अजिबात धक्का लागलेला नाही. इतक्या वास्तूंचे बांधकाम सुरू असले तरी शंभर वर्षांपेक्षा अधिक जुने असणारे अनेक डेरेदार वृक्ष जपले गेले आहेत. त्यातील काही वृक्षांचा घेर इतका मोठा आहे की, खालची जमीनही दिसू नये. अशा प्रकारे गतकाळातील स्मृतिचिन्हे, वास्तू आणि वस्तू जपल्यामुळे इथे नव्या-जुन्याचा उत्तम संगम बघायला मिळणार आहे. मंदिराची देखरेख, सुरक्षा व्यवस्था, भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता होणारी धांदल टाळण्यासाठी इथे सर्व पातळ्यांवर व्यवस्था करण्यात आली आहे. उदाहरणार्थ, सुरक्षेच्या कारणात्सव इथे अग्निशामक यंत्रणा उभारली आहे. त्यासाठी लागणाऱ्या पाण्याची सोयही मंदिर व्यवस्थापनाकडूनच केली गेली आहे. यामुळे लागणाऱ्या पाण्याचा भार अयोध्येतील स्थानिक जलव्यवस्थापन यंत्रणेवर दिलेला नाही. त्याचप्रमाणे सांडपाण्याच्या निचऱ्याची सोयही मंदिर व्यवस्थापनाने केली आहे. त्यासाठी दोन स्वतंत्र प्लांट उभारण्यात आले आहेत. साहजिकच तो भारही स्थानिक प्रशासन यंत्रणेवर येणार नाही. विकलांग, वयस्क भाविकांना दर्शन सुलभ व्हावे यासाठीही इथे खास सोय केली आहे. त्यांच्यासाठी व्हिलचेअर्स उपलब्ध आहेतच, खेरीज लिफ्ट आणि सरकत्या जिन्याची सोयही करण्यात आली आहे. त्यामुळे या लोकांनाही देवाचे दर्शन घेणे सहजशक्य होईल. अशा एक ना अनेक पातळ्यांवरून परिपूर्ण ठरलेले हे काम आपल्यापैकी प्रत्येकाच्या पसंतीस उतरेल अशी आशा करूया आणि या अनोख्या सोहळ्यात सहभागी होऊया.

**- प्रमोद मुजुमदार: ज्येष्ठ पत्रकार**

## शब्दकोडे-२८८



**आडवे शब्द**

१. पुरी फजिती, बोऱ्या ४. नुकतीच आशिया करंडकाचा अंतिम सामना या दोन देशात झाला ९. सापाने टाकलेली त्वचा ११. पृथ्वी १३. अंत:करण १४. मोराचे ओरडणे, मोरोपंतांचा काव्यसंग्रह १६. स्पष्टवक्ता १७. रम्य १९. श्वासाचा अवयव २०. आत काहीही नसलेले, फोल २१. एक दातेरी हत्यार २३. स्वच्छ २४. वृक्ष, झाड २६. टरफलासहित तांदूळ २७. सरस, अधिक श्रेष्ठ ३०. पदोपदी ३२. धडधड ३४. ममता, प्रेम, धन ३५. आंब्याची पोळी ३६. सर्वस्व ३८. आजच्या आधीचा दिवस ३९. सदोदित ४१. चेहरा, मुख ४२. अदृश्य ४३. सोने ४५. परिस्थिती ४७. निवासस्थान ४८. भीती ५०. कारस्थान ५१. अर्धवर्तुळाकृती ५४. गाय ५५. भाषांतर करणारा ५७. खडकाची जमीन ५९. पोपट ६०. लेखणी ६१. शहर, गाव ६३. प्रवासातील टप्पा ६४. पातळ खांब ६५. कर्जाचा बोजा, वजन ६६. माफी ६७. कपाळभर लावलेले कुंकू ६८. घराणे ७१. अमली, कैफी ७२. वेदना ७३. बांगड्या भरण्याचा व्यवसाय करणारा ७५. माणशी प्रमाण ७७. नवा कोरा ७९. जमीनदोस्त ८०. मखर

**उभे शब्द**

१. नेस्तेज, पांढरेधोप २. चुणचुणीत, सुंदर मुलगी ३. नदीचा काठ, बाण ५. सुंदर तरुणी ६. पुत्र, मुलगा ७. रावण, लंकेचा राजा ८. चुलता १०. तात्काळ, लगेच कारवाई १२. रेचक १५. पहिला ऋतू १८. 'भाजे' लेणी या गावाजवळ आहेत १९. अमेरिकेचे अंतराळ संशोधन केंद्र २०. लाटण्याच्या साथीदार २१. पाण्याला आलेली उकळी २२. रंग २५. भारतीय चलन २६. वर्षानुवर्षे २८. हालचाल २९. पवित्र, साखरेचे दाट पाणी ३१. खोदकाम ३२. मेंढपाळ ३३. प्रयत्न ३४. वाजवी, योग्य ३७. हत्तीच्या गंडस्थळातील स्त्राव ३८. कावळा ३९. मनाला टोचणारे दु:ख ४०. जळजळीत, जाळणारे ४४. फायदा, तोटा ४५. सोने ४६. पत्नी, सुंदर स्त्री ४९. पहारेकरी ५०. पाऊल (हिंदी) ५२. प्रमाणपत्र ५३. विपत्तीची कहाणी ५६. एक द्विदल धान्य ५८. अंजनाचा एक प्रकार ५९. गवंडी ६१. मवाळ धोरण ६२. रक्षण करणारा ६३. जुगाराचा एक प्रकार ६४. स्तुती ६७. मळलेली ६९. नवरा (ग्रा.) ७०. पुरुष ७२. पिकांवरील एक रोग, करपलेला भाग ७४. शर्करा ७६. मस्तक ७७. सत्त्व ७८. अंधार

### शब्दकोडे-२८७ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.कमलनयन ६.आसाराम बापू ११.लाज १२.वक्ष १३.गतकाळ १५.मसलत १६.धनी १७.निवारक १८.प्यादे १९.तप २१.तलवार २३.वीर २५.डीर २७.ठक २८.तडा ३०.बरबाद ३२.वाट ३३.ओणवा ३४.परकर ३६.बारदाना ३७.यमराज ४०.तर ४१.वा ४३.नरतनु ४५.पडाव ४७.महान ४९.तास ५०.विजार ५२.गगन ५४.रसद ५७.जरतर ५९.छकडा ६०.नगदनारायण ६३.जमालगोटा ६४.संध्या ६५.माहूत ६६.कलमा ६८.व्याधी ६९.अवसर ७२.कर्जत ७३.पशमीना ७४.रणगाडा ७६.नशीबवान ७८.मिश्रण ७९.पाय ८१.पण ८२.काम ८३.आरसपान ८४.करवत

**उभे उत्तर**

१.कलावंत २.मज ३.नवनीत ४.यक्ष ५.कातर ६.आळ ७.रामदेवबाबा ८.मस ९.बालवाडी १०.पूत १३.गवार १४.काकवी १७.निवाडा २०.पठण २२.लत २४.रबर २६.रवाना २७अ.कवायत २९.परतपरत ३१.दरमहा ३३.ओढूनताणून ३५.करडा ३८.मनुष्य ३९.जयविजय ४२.गलेलठ्ठ ५५.सडासंमार्जन ५६.छंद ५८.रजत ५९.छटाक ६१.गणाधीश ६२.राघव ६७.लकवा ६८.व्यापताप ६९.अनामिका ७०.सरण ७१.काशी ७५.गाजर ७६.नयन ७७.बलक ७९.पापा ८०.अंत

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# रोटेरियन्सनी सेवेचा यज्ञ सातत्याने धगधगता ठेवावा

## रोटरी क्लबतर्फे नाशिकमध्ये भव्य मेळाव्यासह परिषदेचे आयोजन

### गौरांग दास प्रभुजी यांचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**

सेवाभाव जागृत होण्यासाठी बुद्धी, मन व हात एकत्र यावे लागतात. श्रीराम व त्यांचे बंधू सेवेला प्रवृत्त करतात. त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी. श्रीराम सेवेचा श्रेष्ठ आदर्श असून लक्ष्मणाकडे सेवारुपी लक्ष्मी होती. भरत सहनशीलता, सहिष्णूता शिकवतो. शत्रुघ्न नम्रतापूर्वक आशेचा दीप जागवतो. रोटेरियन्सनी हे गुण आत्मसात करुन सेवेचा यज्ञ सातत्याने धगधगता ठेवावा. २२ जानेवारीला अयोध्येत रामलल्लाचे भव्य मंदिर उभे रहात असून प्राणप्रतिष्ठा होत आहे. जगभरात भारताविषयी एक सकारात्मक संदेश त्यातून जाईल. असे प्रतिपादन इस्कॉनचे प्रमुख गौरांग दास प्रभुजी यांनी केले. रोटरी क्लब या आंतरराष्ट्रीय सेवाभावी संस्थेचा भव्य मेळाव्याच्या उदघाट्नप्रसंगी प्रमुख भाषणात ते बोलत होते. हा दोन दिवसीय परिषद व मेळावा शनिवार दि.६ व रविवार दि.७ जानेवारी रोजी ग्रेप काउंटी येथे आयोजित करण्यात आला आहे.

काल प्रमुख पाहुणे रोटरी इंटरनॅशनल प्रतिनिधी पुबूडू झोयसा ( श्रीलंका ) तसेच सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने 'आशाए... ए कार्निवल ऑफ होप ' या परिषद, मेळाव्याचे उदघाट्न करण्यात आले. जयंती सावित्री यांनी गणेश वंदना सादर केली. माजी अध्यक्ष जयेश संघवी यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्ष जयंत खैरनार यांनी रिजन ३०३० च्या प्रतिनिधिनींचे स्वागत केले. रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० च्या गव्हर्नर आशा वेणूगोपाल यांनी स्वागतपर भाषणात परिषद, मेळाव्याचा उद्देश सांगितला. त्या म्हणाल्या, समाजातील विविध गरजू घटकांच्या मदतीसाठी त्यांनी विविध कल्पक व नावीन्यपूर्ण सामाजिक प्रकल्प हाती घेतले आहेत. प्रतिष्ठित आर्क क्लम्फ सोसायटीच्या सदस्या असून आपण रोटरीच्या कार्यात २५०,००० यूएस डॉलर्सचे योगदान दिले आहे. असे त्यांनी नमूद केले. ग्रामीण व निमशहरी भागातील ५५५५ विद्यार्थ्यांना शाळेत येण्याजाण्यासाठी सायकली वितरीत करण्यात आल्या असून मॅग्नम हार्ट इन्स्टिट्यूटचे डॉ. मनोज चोपडा यांच्या सहकार्याने नाशिक जिल्ह्यात वैद्यकीय प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्यात रुग्णांच्या रोगनिदानापासून उपचारांपर्यंत विनामूल्य सेवा देण्यात येते.याकडे वेणूगोपाल यांनी लक्ष वेधले.

१० वर्षांनंतर नाशिकमध्ये होणाऱ्या भव्य मेळाव्यात १८०० रोटरी प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. यावेळी होणारी परिषद सर्व रोटरी क्लबकरिता तसेच समाजासाठी व विविध प्रकल्प, उपक्रमांसाठी महत्वाचे व्यासपीठ ठरेल. मान्यवर वक्ते त्यांचे समृद्ध अनुभव सांगून समाजोपयोगी अभिनव कल्पना मांडतील. या मेळावा व परिषदेच्या यशस्वीतेसाठी सर्व रोटरी पदाधिकारी परिश्रम घेत आहेत असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी सुरुची रणदिवे यांनी संपादित केलेल्या मासिकाचे प्रकाशन करण्यात आले.

सर्वोच्च सेवा पुरस्कार शब्बीर शाकिर (नागपूर), राम गवांदे पुरस्कार देवेश भगत (खामगाव), एडुलजी पुरस्कार राजेश व्यवहारे (नागपूर) यांना देऊन गौरविण्यात आले. आशा वेणूगोपाल यांचा भरघोस देणगीबद्दल सत्कार करण्यात आला. टॉबी भगवागर यांनी संचालन केले. सतीश व मितू मांडोरा यांनी सूत्रसंचालन केले.




### राष्ट्र उन्नतीमध्ये सेवाक्षेत्राचे योगदान

**याशिवाय दुपारच्या सत्रात सरपंच भक्ती शर्मा, मेजर जनरल संजयकुमार विद्यार्थी, आयपीएस अधिकारी कृष्ण प्रकाश, नर्मदा प्रकल्पाच्या प्रमुख भारती ठाकूर आदी मान्यवरांनी उपस्थितांना संबोधित केले. भक्ती शर्मा म्हणाल्या, पदाला सेवेची जोड देऊन परिवर्तन घडवता येते. शासनासोबत देशभरातील रोटेरियन्स एकत्र येऊन ग्रामीण भागाचा कायापालट करु शकतात. ती क्षमता तुमच्यात आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संजयकुमार विद्यार्थी म्हणाले, रोटेरियन्स वेगवेगळ्या क्षेत्रात असतात. त्यांनी आपल्या अनुभवांचा, सत्ता व संपत्तीचा उपयोग राष्ट्रउन्नतीसाठी करुन द्यावा. कृष्ण प्रकाश म्हणाले, सेवाक्षेत्रात कार्य करणे आपण निवडले आहे. त्यात पूर्णपणे झोकून द्यावे व १०० टक्के काम करावे असे आवाहन त्यांनी केले. भारती ठाकूर यांनी नर्मदा परिक्रमा व मध्यप्रदेशातील लेपा येथील आदिवासी विद्यार्थ्यांचे अनुभव सांगून सेवेचे महत्व अधोरेखित केले.**

# नवीन नाशिक सकल मराठा समाजातर्फे बुधवारी बैठक

**नाशिक । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह (क्रॉम्प्टन हॉल) सावतानगर, नविन नाशिक येथे बुधवारी दि. १० रोजी सकाळी १०.३० वाजता सकल मराठा सामजाच्या वतीने २० तारखेच्या मुंबई येथील आंदोलनाच्या सहभागी होण्याच्या नियोजना संदर्भात बैठक होत आहे. या नियोजनाच्या बैठकीसाठी नाशिक जिल्हा समन्वयक समितीचे मार्गदर्शक येत असून सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहावे. असे आवाहन नविन नाशिक सकल मराठा समाजतर्फे करण्यात आले आहे.

## अनधिकृत वृक्षतोड, कोर्टाला दंडाची नोटीस

**नाशिक ।** नाशिक जिल्हा न्यायालयाच्या आवारात चिंचेच्या वृक्षाची विनापरवानगी छाटणी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पालिकेच्या उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाने न्यायालय प्रशासनाला एक लाख रुपयांपर्यंत दंडात्मक नोटीस बजावली असून वृक्षाची छाटणी ठेकेदाराने केल्याचा तोंडी खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे. जिल्हा न्यायालयाच्या मुख्य इमारतीमागील जागेत नवीन इमारत उभारणीचे काम सुरू असून तेथे पूर्वपरवानगी न घेता चिंचेचे झाड तोडल्याचे समोर आले. यासंदर्भात पालिकेच्या उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर उद्यान अधीक्षक विवेक भदाणे यांनी न्यायालय प्रशासनाला एक लाख रुपयांपर्यंत दंड आकारणीच नोटीस बजावली.

**ॲड. निखिल रविंद्र भावसार, धुळे**
**निशाणी क्र.-६**

**जाहीर नोटीस**

**येथील मे. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. २९/२०२४**

श्रीमती. शकुंतला मदनलाल सुराणा वै. ... **अर्जदार**

**विरूध्द**

कै. मदनलाल माणकचंद सुराणा (मयत) ...... **सा.वाला**

ज्याअर्थी की, अर्जदार नं. १ शकुंतला मदनलाल सुराणा हि कै. मदनलाल माणकचंद सुराणा ह्यांची पत्नी आहे तर अर्जदार नं. २ मीता लखीचंद जैन ही कै. मदनलाल माणकचंद सुराणा यांची मुलगी आहे. कै.मदनलाल माणकचंद सुराणा यांचे दि.२२/४/२०२२ रोजी मौजे धुळे येथे निधन झालेले आहे. अर्जदार यांना शासकिय कामांसाठी वारस दाखला मिळण्याकरीता अर्जदारने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट मिळण्याकरीता या मे. कोर्टात अर्ज केलेला आहे. आणि

ज्याअर्थी की, सदर अर्जाचे कामकाज दि. २०/०२/२४ रोजी मे. कोटीत चौकशी कामी नेमलेले आहे.

त्याअर्थी की, सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी वा वकीलांमार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही, हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे

दिनांक - ०५/०१/२०२४ (शिक्का) आदेशावरुन

**व.लि**
**दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**

**अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**

# आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी डॉ. मुकेश मुसळे यांच्या शोधनिबंधाची निवड

**नाशिक । प्रतिनिधी**



आयुष विभागाच्यावतीने दुबई येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी नाशिक येथील होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. मुकेश मुसळे यांच्या शोधनिबंधाची निवड करण्यात आली आहे. या परिषदेत जगभरातून निवड करण्यात आलेले १५० शोधनिबंध सादर केले जाणार आहेत. तसेच या परिषदेत जगभरातील एक लाखांपेक्षा अधिक लोक सहभागी होणार आहेत.

आयुष मंत्रालयाच्यावतीने आयोजित या परिषदेत होमिओपॅथीसह आयुर्वेदीक, युनानी, नॅचरोपॅथी आणि योगाशी संबंधित शोधनिबंध सादर केले जातील. डॉ. मुसळे, काही मुलांमध्ये जन्म झाल्यापासून ते वयाच्या दोन वर्षांपर्यंत आढळून येणारा 'इम्यून थ्रोम्बोसाइटोपेनिक पुरपुरा' या विषयावरील शोधनिबंध सादर करणार आहेत. या आजारात बॅक्टेरियल किंवा व्हायरल इन्फेक्शनमुळे शरिरातील प्लेटलेट्स कमी होतात. त्यानंतर त्या वाढतच नाहीत किंवा जन्मतः प्लेटलेट्स काऊंट कमी असतो, अशा आजारावर होमिओपॅथी औषधांच्या सहाय्याने गुणकारी उपचार करता येत असल्याचा डॉ. मुसळे यांचा दावा आहे. दरम्यान, या शोधनिबंधासाठी डॉ. मुसळे यांना पुणे येथील होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. अमरसिंह निकम, आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. भालचंद्र ठाकरे, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी मुंबई सदस्य डॉ. बाळकृष्ण गायकवाड, जागतिक आयुष संस्था सदस्य डॉ. अमित भस्मे, सचिव डॉ. श्रीलेखा विनोद आदींचे मार्गदर्शन लाभले आहे. दरम्यान, डॉ. मुसळे यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विभागीय उत्तर महाराष्ट्र ओबीसी मोर्चा महाविजय २०२४ भाजपाची संयुक्त बैठक

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशकात मान्यवरांच्या उपस्थितीत ओबीसी मोर्चा उत्तर महाराष्ट्र महाविजय २०२४ विभागीय बैठक संपन्न झाली असल्याची माहिती ओबीसी मोर्चा नाशिक शहराध्यक्ष अजय आघाव व नाशिक महानगर भाजप शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांनी दिली.

उत्तर महाराष्ट्रातील सर्व ओबीसी मोर्चा भाजपा यांना प्रदेश सरचिटणीस प्रभारी विजय चौधरी व भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते तसेच ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष अजय आघाव व उत्तर महाराष्ट्र सहसंयोजिका सुषमा चौधरी- गोराने यांच्या हस्ते नवीन नियुक्ती झालेल्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

सदर बैठक अयोध्या हॉटेल त्र्यंबकरोड सातपूर येथे संपन्न झाली. बैठकीस महाराष्ट्र भाजप प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, ओबीसी मोर्चा प्रदेश अध्यक्ष संजय गाते, नाशिक शहराध्यक्ष प्रशांत जाधव, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, ओबीसी मोर्चा प्रदेश सरचिटणीस गुरूदेव कांदे, प्रदेश सरचिटणीस बापू घडामोडे, प्रदेश सरचिटणीस विनोद दळवी, युवा संपर्कप्रमुख महाराष्ट्र राज्य मच्छिंद्र सानप, उत्तर महाराष्ट्र प्रभारी दीपक पवार, प्रदेश चिटणीस नंदकुमार जेजुरकर, प्रदेश संपर्क प्रमुख रवींद्र चव्हाण, प्रदेश सह संपर्क प्रमुख मनोज ब्राम्हाणकर, उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुख भरत महाजन, उत्तर महाराष्ट्र सहसंयोजक तसेच जिल्हाध्यक्ष ओबीसी महिला मोर्चा नाशिक दक्षिण ग्रामीण सुषमा चौधरी-गोराणे, नाशिक ग्रामीण उत्तर अध्यक्ष शंकर वाघ, नाशिक दक्षिण ग्रामीण अध्यक्ष सुनील बच्छाव, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष माया परदेशी, नाशिक शहर सरचिटणीस सुनील केदार, ॲड. श्याम बडोदे, उत्तर महाराष्ट्र युवा संपर्कप्रमुख मनोज शिरसाठ, ग्रामीण दक्षिण जिल्हाध्यक्ष कैलास पाटील, ओबीसी मोर्चा उत्तर महाराष्ट्रातील सर्व प्रदेश पदाधिकारी व लोकसभा प्रमुख ओबीसी मोर्चा तसेच असंख्य ओबीसी मोर्चातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ॲड. देवराम डी. बागुल धुळे**
**निशाणी क्र.-६**

**जाहीर नोटीस**

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो व.स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज. क्र. ३६/२०२४**

१. शिवाजी नारायण शिंदे उ.वय-४५ वर्ष, धंदा:- शेती
रा. मु. अजनाळे पो. पाडळदे, ता. जि. धुळे
२. सौ. रेखाबाई रामदास कापडणीस उ. वय.:-६१ वर्ष, धंदा:- घरकाम
रा. मु. पो. चिकसे, ता. साक्री, जि. धुळे.
३. संगिता राजेंद्र पवार उ.वय.:- ४६ वर्ष, धंदा:- घरकाम
रा. सावतावाडी, वडनेर, मालेगाव रोड, ता. मालेगाव, जि. नाशिक.
... **अर्जदार**

**विरूध्द**

**कोणीही नाही** ... **सा.वाला**

**आणि**

१. कै. नारायण लखा शिंदे (मयत) मृत्यु दिनांक ०४/०३/२०१५,
२. कै. भटाबाई नारायण शिंदे (मयत) मृत्यु दिनांक : २७/०३/२०२३
दोघांचे मृत्यु ठिकाण - मु. अजनाळे पो. पाडळदे, ता. जि. धुळे....... **मयत**

ज्याआर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. सह दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे न्यायालयात दि. ०३/०१/२०२४ रोजी दि. कि. अर्ज. नं.३६/२०२४ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी कै. नारायण लखा शिंदे (मयत) यांचे अर्जदार नं. १ ते ३ हे कायदेशीर वारस असल्याने त्यांना तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.१६/०२/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस सकाळी ठिक १०:०० वाजता उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे

दिनांक :-०५/०१/२०२४ (शिक्का) आदेशावरुन

**कामगिरी कारकुन**
**मे. दिवाणी न्यायालय**
**सो. कोर्ट नं.**

**अधिक्षक,**
**मे. दिवाणी न्यायालय**
**सो. कोर्ट नं.**

# इंडोनेशियाने भारताकडे केली ९ लाख मेट्रिक टन कांद्याची मागणी

**लासलगाव । वार्ताहर**

इंडोनेशियाने भारताकडून ९ लाख मेट्रिक टन कांद्याची मागणी केली आहे,असे भारत सरकारच्या एका उच्चपदस्थ अधिकार्याने सांगीतले. इंडोनेशिया हा भारताचा एशियातील सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे.अमेरिका,भारत आणि न्यूझीलंड इंडोनेशियाला मधून मोठ्या प्रमाणात कांद्याची निर्यात करतात.

गेल्या ऑगस्ट मध्ये भारताने कांद्यावर ४०% निर्यात कर लादल्यानंतर, व त्यानंतर ऑक्टोबर मध्ये किमान निर्यात मूल्य ८०० प्रति टन केल्यावर,देशांतर्गत पुरवठा आणि पिकांच्या तुटवड्यामुळे किंमती स्थिर ठेवण्यासाठी इंडोनेशिया मार्फत ही विनंती करण्यात आली आहे. कांद्याच्या उच्च किमतींमुळे डिसेंबरमध्ये संपूर्ण निर्यात बंदी घातली गेली,जी २०२३-२४ आर्थिक वर्षाच्या शेवटपर्यंत प्रभावी होती.

भारताने कांद्यावर निर्यात बंदी घातल्यानंतर, इंडोनेशियातील व्यापारी आणि आयातदार भारतीय कांद्याची निर्यात व्हावी यासाठी विनंतीप्रत मागणी करत आहेत असे अधिकार्याने सांगीतले. त्यानुसार सध्या इंडोनेशियाकडून ९ लाख मेट्रिक टन कांद्याची मागणी आहे.

चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल-ऑक्टोबरमध्ये, भारताने इंडोनेशियाला ३६,१४६ टन कांद्यासह १.४ दशलक्ष मेट्रिक टन कांद्याची निर्यात केली. २०२३ च्या आर्थिक वर्षात याच कालावधीत, त्याने १.३५ दशलक्ष टन किचन स्टेपलची निर्यात केली. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय आणि निर्यातदारांच्या आकडेवारीनुसार, २०२३ च्या आर्थिक वर्षात भारताच्या कांद्याची एकूण निर्यात २.५ दशलक्ष टन होती, ज्यात इंडोनेशियाला ११६,६९५ टनांचा समावेश होता.खरं तर, इंडोनेशिया देखील कांदा उत्पादक देश आहे, विशेषतः लहान आकाराचा लाल कांदा. २०२३ मध्ये, इंडोनेशियाने एकूण १९४,१०७ टन कांदा आयात केला आहे आणि यापैकी, भारतातून एकूण निर्यात केवळ ७९,००० टन आहे. निर्यातदारांनी पीक,पॅकिंग, मजूर, स्टफिंग, वाहतूक माल वाहतूक, क्लिअरन्स शुल्क आणि सागरी माल वाहतूक यासाठी ४५ रु देऊन स्थानिक बाजारपेठेत कांदा २० रुपये प्रति किलोने विकला. प्रत्येक कंटेनरसाठी निर्यातदारांना सुमारे २५ रु प्रति किलो नुकसान सहन करावे लागले आहे. बांग्लादेश सीमेवरील निर्यातदारांचेही मोठे नुकसान झाले आहे.

## गयाबाई बाविस्कर यांचे निधन



**नाशिक ।** पिलखोड (ता.चाळीसगाव, जि. जळगाव) येथील मुळ रहिवासी गयाबाई अर्जुनराव बाविस्कर - माळी (वय ७८) यांचे अल्पशा आजाराने काल रविवार, दि. ७ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता छत्रपती संभाजीनगर येथे राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात दिर, मुलगी, दोन मुलगे, सूना, पुतणे, पुतणी, नातवंडे असा परिवार आहे. नाशिक येथील दैनिक भ्रमरचे वृत्त संपादक मुकुंद बाविस्कर, ज्येष्ठ शिक्षक रमेश बाविस्कर व शोभा महाजन यांच्या त्या मातोश्री होत.

**ॲड. दिनेश उत्तम फुले, धुळे**
**निशाणी क्र.-६**

**जाहीर नोटीस**

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो क.स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज क्र.३३/२०२४.**

१. श्रीमती मंडोदराबाई सुभाष परदेशी उ.व.-५७, धंदा - घरकाम
रा. गल्ली नं. ४, कुसुंबा, ता. जि. धुळे.
२. सविता नवनीत परदेशी उ.व.-३८, धंदा-घरकाम,
रा. आखतवाडे, ता. जि. जळगाव.
३. सिमा सुभाष परदेशी उ.व.-३५, धंदा-घरकाम
४. सतिष सुभाष परदेशी उ. व.-३३, धंदा - शेती
५. अश्विनी सुभाष परदेशी उ.व.-३०, धंदा-घरकाम
६. सोनाली सुभाष परदेशी उ.व.-३०, धंदा - घरकाम
सर्व रा. गल्ली नं. ४, कुसुंबा, ता. जि. धुळे. ... **अर्जदार**

**विरूध्द**

**कोणीही नाही** ... **सामनेवाला**

**आणि**

कै. सुभाष श्रावण परदेशी (मयत) (मुलगा) मृत्यु दि. २०/१२ /२०२१
कै. श्रावण पांडु परदेशी (मयत)(वडील) मृत्यु दिनांक : १५/०३/२००६
मृत्यु ठिकाण : कुसुंबा, ता. जि. धुळे ...... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात कै. सुभाष श्रावण परदेशी (मयत) यांचे अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय, अनुकंपतत्वावरील नोकरीकरीता तसेच इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसेच अर्जदार नं. १ ते ६ हे कै. सुभाष श्रावण परदेशी (मयत) यांचे कायदेशीर वारस असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. ०३/०१/२०२४ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.१७/०२/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. सह दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं. ६ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे

दिनांक :- ०५/०१/२०२४ (शिक्का) आदेशावरुन

**कामगिरी कारकुन**
**मे. दिवाणी न्यायालय**
**सो. कोर्ट नं.**

**कामगिरी कारकुन**
**मे. दिवाणी न्यायालय**
**सो. कोर्ट नं.**

# पत्रकारांनी आपल्या स्वास्थ्याकडेही लक्ष द्यावे- डॉ गुंजाळ

### आयएमएतर्फे पत्रकारांचा गौरव

**नाशिक । प्रतिनिधी**

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेचे कार्य झपाट्याने बदलत असून, कामकाज गतिमान झाले आहे. डॉक्टर अन् पत्रकार समाजाच्या विकासासाठी मुख्य घटक आहे.

या बदलत्या परिस्थितीत पत्रकारांनी आपल्या स्वास्थ्याकडेही लक्ष द्यावे, असे आवाहन इंडियन मेडीकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. विशाल गुंजाळ यांनी केले.




इंडियन मेडीकल असोसिएशन नाशिकच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त शनिवारी (दि.६ जानेवारी) शालिमार येथील आयएमए सभागृहात आयएमएतर्फे शहरातील पत्रकारांचा गौरव करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर माजी अध्यक्ष डॉ. प्रकाश जोशी, सहसेक्रेटरी डॉ. निलेश जेजुरकर, डॉ. पंकज भट, नाशिकरोड आयएमएच्या अध्यक्ष डॉ. स्वप्नांजली आव्हाड, सेक्रेटरी डॉ. महेश मांगुळकर आदी उपस्थित होते.

डॉ.गुंजाळ म्हणाले की, डॉक्टरां पाठोपाठ काहीवेळा पत्रकारांनाही समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. परंतु दोन्ही घटकांचा उद्देश हा समाजाची अन् देशाची सेवा करणे आहे. त्यामुळे पुढील काळातही पत्रकारांनी लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी अधिक जोमाने काम करावे असे आवाहन डॉ. गुंजाळ यांनी केले. यावेळी पत्रकारांच्या वतीने प्रविण बिडवे यांनी प्रातिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन जितेंद्र येवले यांनी केले. कार्यक्रमास पत्रकारांचे परिवार, आयएमएचे पदाधिकारी, डॉक्टर उपस्थित होते.

यांचा झाला सत्कार

सोहळ्यात प्रविण बिडवे, रमेश पडवळ (महाराष्ट्र टाईम्स), प्रशांत कोतकर, अरुण मलानी ( सकाळ), संतोष सोनवणे ( टाईम्स ऑफ इंडिया), धनंजय बोडके ( लोकनामा), चंद्रशेखर गोसावी (हमारा महानगर), रवींद्र केडिया, नरेंद्र जोशी ( देशदूत) अतुल भांबेरे, योगेश गांगुर्डे (पुण्यनगरी), निलेश अमृतकर, सचिन जैन (दिव्य मराठी), देवयानी सोनार (गावकरी), कुमार कडलग (प्रहार), अनिकेत साठे ( लोकसत्ता), अजय भोसले (लक्ष महाराष्ट्र), धनंजय रिसोडकर, संदीप भालेराव (लोकमत), स्मिता कावळे (लोकमत टाईम्स), जितेंद्र येवले ( लोकज्योती), जितेंद्र सपकाळे (देशदूत टाईम्स), सतिश डोंगरे (पुढारी), योगेश रोकडे( लोकमंथन), मुकुंद बाविस्कर (भ्रमर ), अकील पटेल ( आपलं महानगर).

## न्यूज कॉलम

### नाशिक शहरात घरफोड्यांचे सत्र; ७ लाखांचा ऐवज चोरीला

**नाशिक ।** शहर पोलिसांनी हायप्रोफाईल घरफोडीची उकल केल्यानंतरही शहरातील घरफोड्यांचे सत्र सुरु आहे. शहरात आणखी चार घरफोड्या झाल्याप्रकरणी पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. या घरफोड्यांमध्ये चोरट्यांनी सव्वा सात लाखांचा ऐवज चोरुन नेला. दोन घरफोड्या या इंदिरानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतच घडल्या आहेत. अशोका मार्ग परिसरातील कल्पतरु नगरमधील बंद फ्लॅटचा कडीकोयंडा तोडून चोरट्यांनी चांदीचे दागिने व रोकड असा ३ लाख २३ हजार ६०० रुपयांचा ऐवज चोरून नेत घरफोडी केली.

### दीड वर्षाचा बिबट्या अडकला पिंजऱ्यात

**सिन्नर ।** पंचाळे जवळील पिंपळगाव येथे दीड वर्षाचा बिबट्या पिंजऱ्यात अडकला. एक दिवसापूर्वीच बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात आला होता. शनिवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास तानाजी गायधनी यांच्या शेतात बिबट्या अडकला. बिबट्या पाळीव प्राण्यांवर हल्ले करत असल्याने पिंजरा लावण्याची मागणी केली होती.

# पाणीपुरवठा योजनांची कामे मुदतीत पूर्ण न करणाऱ्या मक्तेदारांवर कारवाई करणार

## मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता यांचा आढावा बैठकीत इशारा

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे अतिशय संथगतीने सुरू आहेत. सदरची प्रलंबित कामे फेब्रुवारी २०२४ अखेर पूर्ण करावी, अन्यथा संबंधित मक्तेदारांवर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल असा इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिला.

जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत जिल्ह्यात ४४८ कामांना मंजुरी देण्यात आली असून शंभरावर कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे मुदतीत पूर्ण व्हावीत यासाठी योजनांचे काम करणाऱ्या मक्तेदारांची बैठक मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. याप्रसंगी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती जयश्री सार्वे, तसेच उपअभियंता श्री संजय पढयार, श्री हरिश्र्चंद्र पवार, श्रीमती जास्वंदी देवरे, श्री रवींद्र देसले तसेच मक्तेदार आणि प्रकल्प सल्लागार संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी श्री गुप्ता यांनी धुळे साक्री, शिंदखेडा, शिरपूर अशा चारही तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा गाव निहाय आढावा घेतला. यावेळी मक्तेदारांच्या अडचणी ही जाणून घेतल्या. बऱ्याच योजनांचे काम संथ गतीने सुरू असल्याचे आढावा प्रसंगी निदर्शनास आले. त्याबद्दल श्री गुप्ता यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. यावेळी बोलताना श्री गुप्ता पुढे म्हणाले की, जल जीवन मिशन हा केंद्र शासनाचा महत्त्वकांक्षी प्रकल्प आहे.या योजनेअंतर्गत मंजूर झालेली कामे मुदतीत होणे अपेक्षित आहे. मात्र असे असतानाही जिल्ह्यातील बऱ्याच योजनांची कामे अतिशय संथ गतीने सुरू आहे. वारंवार पाठपुरावा केल्यानंतर देखील त्यामध्ये अपेक्षित प्रगती झालेली दिसून येत नाही. मक्तेदारांच्या दुर्लक्षामुळे केंद्र शासनाच्या महत्त्वकांक्षी योजनेचा खोळंबा होत आहे. म्हणून मक्तेदारांनी पाणीपुरवठा योजनेच्या कामात दिरंगाई करू नये . प्रलंबित असलेल्या योजनांचे काम कुठल्याही परिस्थितीत फेब्रुवारी २०२४ अखेर पूर्ण करावे. त्यासाठी प्रशासकीय पातळीवरून कुठलीही अडचण उद्भवणार नाही. मात्र तरीदेखील योजनांचे काम मुदतीत पूर्ण न झाल्यास संबंधित मक्तेदारांवर कारवाई करण्यात येईल असा इशारा श्री गुप्ता यांनी यावेळी दिला. तसेच या पुढील काळात मी योजनेच्या कामाच्या ठिकाणी भेटी देऊन पाहणी करणार आहे. कामाची प्रगती समाधानकारक न दिसल्यास कारवाई केली जाईल. त्यामुळे मक्तेदारांनी हा विषय गांभीर्याने घेऊन कामात प्रगती करावी, काम मुदतीत पूर्ण करावे असे श्री गुप्ता यांनी सांगितले. याप्रसंगी उपस्थित मक्तेदारांनी पाणीपुरवठा योजनेचे काम मुदतीत पूर्ण करण्याची हमी दिली.



# केंद्र, राज्य शासनाच्या योजना अल्पसंख्यांकापर्यंत पोहचाव्यात

### भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांचे आवाहन

**नाशिक ।लक्ष महाराष्ट्र वृत्त**

अल्पसंख्यांक मोर्चा उत्तर महाराष्ट्राची बैठक भाजपा कार्यालय वसंतस्मृती येथे सभागृहात संपन्न झाली. यावेळी भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी केंद्र व राज्य शासनाच्या योजना समाजातील सर्व घटकापर्यंत पोहचाव्यात, या योजनांची पुरेपुर माहिती देण्यात यावी व या योजनांचा लाभ त्यांना मिळवून देण्यात यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव, अलपसंख्यांक मोर्चा प्रदेश सरचिटणीस एजाज शेख, उपाध्यक्ष सलिम बागवान, पप्पु भाई शेख, अकबर शहा, नाशिक महानगर सरचिटणीस सुनिल केदार, ड.शाम बडोदे, रोहिणी नायडू, अल्पसंख्यांक मोर्चा नाशिक शहराध्यक्ष आरिफ काझी, अल्पसंख्यांक मोर्चा उत्तर महाराष्ट्र विभागीय प्रमुख मुझम्मील मिर्झा, अल्पेश पारख, अल्पसंख्यांक मोर्चा शिर्डी लोकसभा संयोजक आसिफ पठाण, नाशिक लोकसभा संयोजक फिरोज शेख, नंदुरबार लोकसभा संयोजक जाकिर पठाण, दिंडोरी लोकसभा संयोजक जलिल अन्सारी, माजी नगरसेविका शाहिन मिर्झा, अहमद अबु काझी, गुलाब सय्यद, सलिम मिर्झा, पप्पु शेख, वसिम शेख, फिरोज शेख, सुनिल राठी, अकिल काद्री, भाजपा नाशिक महानगर अल्पसंख्यांक मोर्चा महिला अध्यक्षा हिना शेख, उपाध्यक्ष नाझिया खाटीक, रुही पठाण, राजश्री शिंदे, शेरॉन रॉड्रीक्स आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

सुत्रसंचालन जलिल अन्सारी यांनी केले. आभारप्रदर्शन फिरोज शेख यांनी केले. यावेळी सलाउद्दीन शेख, जावेद बाबामिया शेख, इकबाल नोडे, रफिक सय्यद, मनोज टोडारवाल, आदिल शेख, मुफद्दल पेंटर, अब्दुल शेख, आसिफ काझी, अयुब काझी, फारुख काझी, अलिम काझी, फैस सय्यद, सैफ सय्यद आदींसह उत्तर महाराष्ट्रातील अल्पसंख्यांक मोर्चाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# बुद्धप्रिया पगारेंनी सुरु केले शिवभोजन केंद्र

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



केंद्रीय सामाजिक न्याय विभागाचे राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त गरीब व गरजू लोकांसाठी राजकीय व सामाजिक कार्यकर्त्या बुध्दप्रिया पगारे यांच्या वतीने शिवभोजन सुरु करण्यात आले आहे. बुध्दप्रिया पगारे संचालिका असलेल्या या शिवभोजन केंद्राचे पैलवान नानाभाई साळवे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. बुध्दप्रिया पगारे या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या आठवले गटाच्या धुळे जिल्हा महिला आघाडीच्या कार्याध्यक्ष आहेत. त्यांनी सामाजिक जाणिवेतून सुरु केलेल्या शिवभोजन केंद्रावरून गरीब व गरजू लोकांना अत्यंत अल्प दरात शिवभोजनाचा लाभ मिळणार आहे. या शिवभोजन केंद्राच्या उदघाटनप्रसंगी धोंडीराम पगारे यांच्यासह नागरिक व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या आठवले गटाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### दोंडाईचा येथील तरुण बेपत्ता

**दोंडाईचा ।** येथील तरुण घरातून निघून गेला असून अद्यापही तो परतलेला नाही. भावेश अभिमन्यू



मोरे (वय ४२) असे त्यांचे नाव आहे. दोंडाईचा येथून ४ जानेवारी सायंकाळी पाचला ते घराबाहेर पडले. दोंडाईचा येथून मोटर सायकलने (एमएच१८/बीबी९६९९) नंदुरबार येथे जाण्यासाठी निघाले. परंतु त्यानंतर ते अद्यापही परतलेले नाहीत. विविध ठिकाणी शोध घेऊनही त्यांच्याविषयी माहिती मिळालेली नाही. त्यांनी अंगात पिवळा आणि निळ्या पट्टयाचा रंगाचा शर्ट घातला होता. कुटुंबीयांनी दोंडाईचा पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीनुसार हरवल्याची नोंद झाली. यासंदर्भात माहिती मिळाल्यास जवळचे पोलीस ठाणे किंवा या मोबाईल ( ७५०७९२७९३५, ९३२७४५४७९३,) क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही कुटुंबीयांतर्फे करण्यात आले.

# सुरेश जगन्नाथ बहाळकर यांचा सेवापूर्ती कृतज्ञता समारंभ संपन्न

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



खान्देश कुंभार समाज विकास व शैक्षणिक संस्था धुळेचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य कुंभार सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष सुरेश जगन्नाथ बहाळकर यांची धुळे जिल्हा पोलीस दलात ३३ वर्षे सेवापुर्ती झाल्याने त्यांचा सेवापूर्ती कृतज्ञता समारंभ रविवार दिनांक ७ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला होता.

खान्देश कुंभार समाज विकास व शैक्षणिक संस्था, प्रजापत, गुजराथी कुंभार व महिला आघाडी धुळे जिल्हा यांच्या वतीने या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. भाजपा ओबीसी ओमोर्चचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी महापौर प्रतिभा चौधरी, भाजपा शहर उपाध्यक्ष ऍड, किशोर जाधव, सोमनाथ सोनवणे, पुनमचंद वाडिले, डॉ सुरेश काळे, उत्तमराव काळे, हृदयेश चव्हाण, गणेश अहेर, प्रमोद जाधव, एस.व्ही. तायडे, बबनराव जगदाळे, सुधीर पोतदार यांच्यासह बहाळकर कुटुंबीय, हितचिंतक, मित्रपरिवाराची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय शूटिंगबॉल स्पर्धेसाठी राज्याचे संघ जाहीर



**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

राज्य शूटिंगबॉल असोसिएशनच्या मान्यतेने, हौशी शूटिंगबॉल असोसिएशन, धुळे व आदर्श ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे शहराच्या मोहाडी उपनगरातील श्री. पिंपळादेवी विद्यालयाच्या मैदानात ३७ वी, राज्यस्तरीय सबज्युनिअर शूटींगबॉल स्पर्धा पार पडली. त्यातून फैज अहमद बेगमपुरे (सोलापूर), अशोक तायडे (जळगाव) व मयुर ठाकरे (नंदुरबार)आणि महेंद्र गावडे (धुळे), नईम शेख (जामनेर), नितीन उकरडे (लातूर) या निवड समिती सदस्यांनी मुले व मुलींचे महाराष्ट्र राज्याचे दोन्ही संघ निवडले.

निवडलेला मुलांचा संघ- कर्णधार- रणजित पाटील (कोल्हापूर ), उपकर्णधार- श्रीहरी साठे, सक्षम कोळी (सोलापूर), वेदांत निकम, रोहण कांबळे (कोल्हापूर ), शेख अबुजान समिर (अहमदनगर ), रोहित बारे (जळगाव ), सार्थक शिंदे (औरंगाबाद ), विठ्ठल कदम (परभणी ), सचिन ठोंबरे (औरंगाबाद ), रोहित ठाकरे (जळगाव ), कार्तिक वाघ (धुळे ), राखीव- निरज देवरे (नंदुरबार ), गुरु गायकवाड ( सोलापूर ), जगंद शेख (अहमदनगर ), मुलींचा संघ- कर्णधार- अनम रंगरेज (सोलापूर ), मृणाली ढोले (धुळे ), राधिका सरनागिरे (लातूर ),अंजली मळगे (सोलापूर ), देव्यानी मराठे (धुळे ), नेहा धनगर (औरंगाबाद ), मयुरी मोकळे ( औरंगाबाद मनपा ), भाग्यश्री सुर्यवंशी (लातूर ), पुजा राऊत (सोलापूर ), वैष्णवी शर्मा (धुळे ), अनुष्का चामटे (अमरावती ), कृतिका पाटील (नाशिक ), राखीव- कार्तिकी गडगडे (सोलापूर ), अनुज ललवाणी (धुळे ), जान्हवी नरवडे (औरंगाबाद ) यांचा समावेश आहे.

### भाजपाअनुसुचित जमाती आघाडी महानगर अध्यक्षपदी : राज माने

**धुळे ।** भारतीय जनता पार्टीच्या अनुसूचित जमाती आघाडीच्या धुळे महानगर अध्यक्षपदी राज माने यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा धुळे शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र महादेव



अंपळकर यांनी राज माने यांनी नियुक्तीपत्र देऊन अभिनंदन केले. तसेच पुढील पक्षीय जबाबदाऱ्या पार पाडण्याबाबत मार्गदर्शन केलं. आपण आपल्या कार्यप्रणालीने भाजपा संघटन वाढीसाठी आपले अमुल्य योगदान द्यावे असेही गजेंद्र अंपळकर यांनी आव्हान केले. या संघटनात्मक नियुक्तीमुले राज माने यांचे अनेक मान्यवर, हितचिंतक, मित्रपरिवार व कार्यकर्ते यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिलया आहेत.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ उपकेंद्राचे काम लवकर सुरू करा

### अन्यथा मनसे स्टाईल आंदोलन छेडण्याचा इशारा

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाशिक उपकेंद्रचे बंद काम त्वरित सुरू करावे, अन्यथा आंदोलन करण्यात येइल असा ईशारा मनसे विद्यार्थी सेनेने दिला आहे. नाशिकला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकेंद्र व्हावे यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने नाशिक उपकेंद्राचे समनव्यक संजय सानप यांना निवेदन देण्यात आले.

नाशिक उपकेंद्राचे काम लवकरात लवकर सुरू करून हे उपकेंद्र निदान यावर्षी तरी सुरू करावे अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने उपकेंद्र बाहेर मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात येईल. याची जबाबदारी नाशिक पुणे विद्यापीठाच्या उपकेंद्राची असेल याची दखल घ्यावी असा इशारा मनसे विद्यार्थी सेनेच्या शिष्टमंडळाने निवेदनात दिला आहे. यावेळी मनसेची मागणी विद्यापीठाला कळवण्यात येईल आणि लवकरात लवकर काम सुरू केले जाईल असे आश्र्वासन देण्यात आले. यावेळी मनसे विद्यार्थी सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष संदीप भवर, प्रदेश कार्यकारणी सदस्य शशिकांत चौधरी, बाजीराव मते, जिल्हाध्यक्ष गणेश मोरे, कौशल पाटील, उपजिल्हा अध्यक्ष नितीन धानापुणे, शहर अध्यक्ष ललित वाघ, शहर संघटक अक्षय कोंबडे, विभाग अध्यक्ष मेघराज नवले, अविनाश जाधव, गणेश शेजुळ, दीपक बोराडे, विधीचे महेंद्र डहाळे आदी उपस्थित होते.

# थंडीमुळे रब्बी हंगामातील पिकांना दिलासा; आठवडेबाजारावर परिणाम

**नाशिक ।** इगतपुरी शहरासह तालुक्यात शीतलहरीमुळे तापमानाचा पारा १२ ते १३ अंशांपर्यंत खाली घसरला आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्याबरोबरच इगतपुरी तालुक्यात चांगलाच प्रभाव जाणवत आहे. गेल्या चार-पाच दिवसांपासून थंडीचा प्रचंड कडाका वाढल्यामुळे घोटी-इगतपुरीकरांना हुडहुडी भरली आहे.

सकाळी आणि रात्री ठिकठिकाणी शेकोट्या पेटल्या आहेत, तर सर्वाधिक वर्दळीचा मुंबई-आग्रा महामार्गसुद्धा सध्या मंदावला आहे. तर तालुक्याच्या विविध भागांत जनजीवनावर याचा परिणाम दिसून येत आहे. नाशिक जिल्ह्यात सर्वत्र शीतलहरी कायम असल्या तरी थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळख असणाऱ्या इगतपुरी तालुक्यात याचा प्रभाव वाढला आहे. त्याचा परिणाम सध्या सर्वत्र जाणवत आहे. त्यामुळे काही भागात थंडीची लाट पसरली आहे.

# मेट इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी महाविद्यलयाच्या 'पाथ फाइंडर' नियतकालिकास द्वितीय क्रमांक

### प्रेरणा दिन : राज्यस्तरीय फार्मा मॅगझीन स्पर्धेत मिळाले यश

**नाशिक। लक्ष महाराष्ट्र वृत्त**

असोसिएशन ऑफ फार्मास्युटिकल टीचर्स ऑफ इंडिया व केबीएच ट्रस्ट संचलित फार्मसी महाविद्यालय, मालेगाव- अंतर्गत गुणवत्ता विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१५ डिसेंबर रोजी 'प्रेरणा दिन' मोठ्या उत्साहात साजरा झाला. स्व.डॉ.बळीराम हिरे यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाने 'राज्यस्तरीय फार्मा मॅगझीन स्पर्धा-२०२३' आयोजित केली होती.

या स्पर्धेत मुंबई एज्युकेशनल ट्रस्ट (मेट) भुजबळ नॉलेज सिटी नासिक औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. प्रमाणपत्र ,ट्रॉफी व रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे. स्पर्धेस संपूर्ण महाराष्ट्रातून तब्बल ६० हुन अधिक महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता.

आजपर्यंत पाथफाइंडर नियतकालिकास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अनेकदा गौरवण्यात आलेले आहे. त्यात केवळ साहित्यच नाही तर वर्षभरात झालेल्या कार्यक्रमांची क्षणचित्रेही आहेत. शैक्षणिक वर्षात असलेल्या विविध समित्यांचे अहवाल, विविध विभागांचे अहवाल, गुणवत्ता यादी, पुरस्कारांची यादी, शिक्षकांचे कार्यकर्तृत्व, एनएसएस, वार्षिक स्नेहसंमेलन त्यामध्ये उत्सुफुर्ततेने सहभागी होणारे विद्यार्थी, त्यांनी संपादन केलेले यश याची दखल त्यात घेतली जाते. त्यात अनेक घडामोडींचा आलेख मांडलेला असून मराठी, हिंदी, इंग्लिश या तिन्ही भाषांच्या साहित्याचा आस्वाद त्यात समाविष्ट केलेला आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य व मुख्य संपादक डॉ.संजय क्षिरसागर, समन्वयक प्रा. अभिष जाधव आणि इतर सर्व प्राध्यापक व विदयार्थी यांचे या प्रकाशनास मोलाचे सहकार्य लाभले.

# हस्ती स्कूलच्या दोन उपकरणांची राज्यपातळीवरील विज्ञान प्रदर्शनासाठी निवड

### जिल्हास्तर प्रदर्शनात पटकावली तीन पारितोषिके

**दोंडाईचा । लक्ष महाराष्ट्र वृत्त**





हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु कॉलेज व हस्ती वर्ल्ड स्कूल दोंडाईचा येथील बालवैज्ञानिक विद्यार्थी व शिक्षक आणि लॅब असिस्टंट हे ४४ व्या धुळे जिल्हा विज्ञान प्रदर्शनात सहभागी झाले होते. सदरचे विज्ञान प्रदर्शन दि. ५ व ६ जानेवारी २०२४ दरम्यान, शिक्षण विभाग जि.प. धुळे, धुळे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ व धुळे जिल्हा विज्ञान व गणित अध्यापक संघ यांचे संयुक्त विद्यमाने महाराणा प्रताप हायस्कूल धुळे येथे संपन्न झाले.

यात हस्ती स्कूलने तीन गटात पारितोषिक प्राप्त केले. यातील हस्ती वर्ल्ड स्कूलच्या दोन उपकरणांची आगामी राज्य पातळीवर संपन्न होणाऱ्या राज्य विज्ञान प्रदर्शनासाठी अभिनंदनीय निवड करण्यात आली. याआधीही विद्यार्थ्यांच्या माध्यमिक गटात ३ वेळा; व प्रयोगशाळा साहाय्यक गटात ९ वेळा हस्ती स्कूलच्या उपकरणांची राज्यपातळीवर स्तुत्य निवड झाली आहे. यावर्षी सदरच्या ४४ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात गणित शैक्षणिक साधन निर्मिती - उच्च प्राथमिक गट इ. ६ वी ते ८ यात हस्ती वर्ल्ड स्कूल गणित शिक्षिका अनिता शिंदे यांच्या ' मेकस् मॅथस् इजी ' या साधनास प्रथम क्रमांक; तर विद्यार्थ्यांचा प्राथमिक गट - इ. ६ वी ते ८ वी - दुर्वेश अनिलकुमार ठाकरे - मॉडर्न ऍग्रीकल्चर टेक्निक - या उपकरणास द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. यास्तव त्यांची आगामी राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी स्तुत्य निवड करण्यात आली. तसेच शैक्षणिक साहित्य निर्मिती प्रयोगशाळा साहाय्यक गटात हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज लॅब असिस्टंट - विजय मधुकर चौधरी यांच्या ' सायन्स किट्स- शैक्षणिक साधने ' या उपकरणास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. वरील यशस्वी बालवैज्ञानिक विद्यार्थ्याला हस्ती स्कूल विज्ञान विभाग प्रमुख कपिल सोनवणे व विज्ञान शिक्षिका मनिषा ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशास्तव बालवैज्ञानिक दुर्वेश ठाकरे आणि शिक्षिका अनिता शिंदे व लॅब असिस्टंट विजय चौधरी यांचे हस्ती स्कूल शालेय समिती चेअरमन कैलास जैन, तसेच प्राचार्य हरिकृष्ण निगम, प्राचार्य गोविंद गांगुर्डे यांनी अभिनंदन केले व आगामी राज्य स्तरावरील विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या. हस्ती स्कूल दरवर्षी नियमितपणे अशा स्वरूपाच्या विज्ञान प्रदर्शनांमध्ये विद्यार्थी व शिक्षकांना सहभागी होणेस प्रेरित करते. याद्वारा त्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन व जाणीवा वृद्धींगत होणेस साहाय्य होते.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
सोमवार दि. ८ जानेवारी २०२४




# जीवनात व्यवहार ज्ञानाची गरज:राजगोपाल भंडारी

## आर.सी.पटेल प्राथमिक शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विविध स्पर्धा व बाल आनंद मेळावा











शिरपूर

। शहरातील आर.सी.पटेल प्राथमिक शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. बालिका दिनाचे औचित्य साधून रांगोळी स्पर्धा, भेटकार्ड स्पर्धा व बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी शिरपूर एज्युकेशन सोसायटी उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संस्था सल्लागार श्रीमती रेषा पटेल, सीईओ डॉ. उमेश शर्मा, माजी नगराध्यक्ष संगीताताई देवरे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय वरसाळे, प्राचार्य आर.एन.पवार, मुख्याध्यापक मनोज पाटील, गणेश साळुंके, बापू सोनवणे, रेखा सुर्यवंशी, महेंद्रसिंग परदेशी, डॉ. सय्यद इफ्तेखार, विद्यालयाचे मुख्याध्यापक सी.डी.पाटील आदी उपस्थित होते. बाल आनंद मेळाव्यातील विविध खाद्यपदार्थ पाहणी करतांना उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांनी विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानासाठी या पद्धतीने प्रात्यक्षिके करून घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. रांगोळी स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी गट १ इयत्ता तिसरी प्रथम सृष्टी पाटील, द्वितीय परिणीती तायडे, तृतीय राज खलाणे, गट २ इयत्ता चौथी प्रथम वसुधा तोरसल्ले, द्वितीय ऐश्र्वर्या शिरसाठ, तृतीय जिज्ञासा ठाकरे, भेटकार्ड स्पर्धा निकाल गट बालवाडी ते दुसरी प्रथम श्रध्दा महाजन, द्वितीय प्रियांश बारी, तृतीय नक्षत्र पाटील, तृतीय मिताली चौधरी. सूत्रसंचालन विवेकानंद ठाकरे व आभार गजेंद्र जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संयोजन केले.

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# प्रेस क्लब संस्कृतीच्या युगात पत्रकार संघ टिकून: खा. राऊत

## पत्रकारदिनी पत्रकार भवनात दर्पणकारांच्या प्रतिमेचे पूजन

















धुळे। पत्रकार प्रेस क्लबच्या अत्याधुनिक युगातही मुद्रित माध्यमे व इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे पत्रकार संघ टिकवून ठेवत त्याचा कारभार उत्तम प्रकारे चालवीत असल्याचे पाहून खूप समाधान व अभिमान वाटत असल्याची भावना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा दैनिक सामनाचे कार्यकारी संपादक, खा.संजय राऊत यांनी व्यक्त केली. खा. राऊत हे धुळे दौऱ्यावर आले असता त्यांनी पत्रकार दिनाचे औचित्य साधून आपल्या नियोजित कार्यक्रमांमधून वेळ काढत धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार भवनास भेट दिली. पत्रकार भवनाचे रुपडे पाहून खा. राऊत चांगलेच भारावले. पत्रकार भवनातील मौल्यवान, दुर्मिळ ग्रंथसंपदा पाहून राऊत यांनी समाधान व्यक्त केले. यातील अनेक पुस्तकांच्या लेखकांशी माझा वेळोवेळी प्रत्यक्ष संबंध आला आहे. त्यातील काही लेखक माझे चांगले मित्र असल्याचे खा. राऊत यांनी नमूद केले. मी सर्वात अगोदर एक पत्रकार आहे. याची रोजच जाणीव ठेवतो. माझ्यासोबत नेहमी कोरे कागद व पेन बाळगतो. दररोज लिखाणाची सवय यातूनच माझी पत्रकारिता मोठी झाली आहे. मी दैनिक सामनाला सर्वात आधी प्राधान्य देतो. पत्रकारितेच्या विश्वात प्रिंट मीडियाचे महत्व कधीच कमी होणार नाही असा ठाम विश्वास खा. राऊत यांनी व्यक्त केला. संघातर्फे खा. राऊत यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, नुरखान पठाण, विद्यमान अध्यक्ष मनोज गर्दे, उपाध्यक्ष अतुल पाटील, सचिव सचिन बागुल, कोषाध्यक्ष तुषार बाफना, प्रांतिक प्रतिनिधी प्रकाश शिरसाठ, पुरुषोत्तम पाटील, आकाश सोनवणे, दीपक पाटील, पंकज पाटील, अजिंक्य देवरे, पुरुषोत्तम गरुड उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ